शुक्रवार, १४ ऑक्टोबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ८७
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## दिवाळीसाठी एसटीच्या पंधराशे जादा गाड्या



**मुंबई** : दिवाळी आणि जोडून येणाऱ्या सुट्ट्यांचा कालावधी पाहता गावी किंवा पर्यटनासाठी जाणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने यंदा राज्यभरात दिवाळीनिमित्त १४९४ जादा बस गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. ही जादा वाहतूक २१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबरदरम्यान चालवण्यात येणार असल्याची माहिती एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी दिली आहे. मध्यवर्ती कार्यालयातील वाहतूक खात्यामार्फत सर्व विभागांना दिलेल्या आदेशानुसार जादा गाड्या आरक्षणासाठी उपलब्ध करून दिल्या असून सर्व प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही चन्ने यांनी केले आहे. त्याचप्रमाणे प्रवाशांची वाढती गर्दी पाहून टप्प्याटप्प्याने गाड्यांची संख्याही वाढविण्यात येणार आहे.

अंतरंग

ठाकरे सेनेवर आता लाल रंगाची झालर -उपाध्ये/२

परतीच्या पावसाचा पर्यटनालाही फटका/५

महिला आशिया चषक स्पर्धा; भारत अंतिम फेरीत/८

# रायगडच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध

## पालकमंत्री उदय सामंत यांची ग्वाही; अलिबागेत बैठक



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन काम करावयाचे आहे. आपण जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून जिल्ह्यासाठी शासनाकडून प्राप्त झालेला विकासनिधी संबंधित यंत्रणांनी विहीत कालावधीत खर्च करावा, असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी (दि. १३) येथे केले. जिल्हा नियोजन व विकास समितीची बैठक पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्या वेळी ते बोलत होते. **(पान २ वर..)**




(छाया : जितू शिगवण)

## ‘मुरूड-रोहा परिसरात बल्क ड्रग पार्क उभारणार’

**अलिबाग** : प्रकल्पासाठी जागा होऊ न शकल्याने रायगड जिल्ह्यात बल्क ड्रग प्रकल्पाला मंजुरी मिळू शकलेली नाही, पण तरीही राज्य सरकारच्या उद्योग विभागाच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील मुरूड आणि रोहा परिसरात बल्क ड्रग पार्कची उभारणी केली जाईल, अशी माहिती राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी (दि. १३) येथे दिली. ते जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलत होते. आमदार भरत गोगावले, जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर सोबत होते.

रोहा आणि मुरूड तालुक्यात केंद्र सरकारचा बल्क ड्रग पार्क प्रकल्प प्रस्तावित होता. त्यासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू होती, पण अपेक्षित असलेले भूसंपादन पूर्ण होऊ शकलेले नाही. तांत्रिक अडचणी होत्या. या अडचणींची मी माहिती घेतली आहे. मुरूडमधील बऱ्याचशा जागा आजही नवाबांच्या नावावर असून त्या जागांवर कुळ लागले आहेत.



त्यामुळे भूसंपादनात अडचणी निर्माण होत आहेत. कुळांचे प्रश्न सोडवून चांगला दर देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही ना. उदय सामंत म्हणाले.

जिल्ह्यात औद्योगिकरणासाठी यापूर्वी संपादित केलेल्या जागांचा आढावा घेणार असून ज्या जागा उद्योजकांनी घेतल्या आहेत, पण प्रकल्प उभारलेला नाही अशा जागा कायद्यान्वये ताब्यात घेण्याची कारवाई करणार आहोत. त्या ठिकाणी नवे उद्योग कसे येतील याचेही प्रयत्न सरकारच्या माध्यमातून केले जातील, असे ना. सामंत म्हणाले.

पनवेल महापालिकेच्या स्थापनेनंतरही मुद्रांक शुल्कातून मिळणारा निधी रायगड जिल्हा परिषदेकडे चुकून जमा झाला आहे. जिल्हा परिषदेकडून सुमारे ३२ कोटी रुपये महापालिकेला देणे अपेक्षित आहे. हा निधी टप्प्याटप्प्याने महापालिकेला देण्यात यावा, असे निर्देश दिल्याचेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

(छाया : अरुण नलावडे)




# चारही ग्रामपंचायतींमध्ये विजयश्री खेचून आणू

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा चौकमध्ये निर्धार

**खालापूर : प्रतिनिधी**

केंद्र आणि राज्य सरकार आपले आहे आणि विकासाची दूरदृष्टी आमदार महेश बालदी यांच्यामध्येही आहे. त्यामुळे सुज्ञ मतदारांनी परिवर्तन आघाडीच्या मागे ठामपणे उभे राहावे. म्हणजे आपण चौकसह परिसरातील चारही ग्रामपंचायतींमध्ये विजयश्री खेचून आणू, असा निर्धार भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी (दि. १३) व्यक्त केला. ते चौक येथील भव्य जाहीर सभेत बोलत होते.

भाजप, बाळासाहेबांची शिवसेना, मनसे व रिपाइं (आठवले गट) परिवर्तन आघाडीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ पोतदार सभागृहात जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला आमदार महेश बालदी, माजी आमदार देवेंद्र साटम, शिवसेना उपनेते विजय चौगुले, भाजप नेते विनोद साबळे, खालापूर तालुकाध्यक्ष रामदास ठोंबरे, लक्ष्मण पवार, मनसेचे आशिष चौधरी, गोपीनाथ जाधव, आरपीआयचे महेंद्र धनगावकर, प्रमोद महाडिक, पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका विद्या गायकवाड, चौक ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदाच्या उमेदवार गायत्री गणेश कदम व सदस्यपदाचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी आमदार महेश बालदी यांनी येथील जनतेला सहा महिन्यांत वीज, पाणी, रस्ता देऊ, असे सांगितले. ते पुढे म्हणाले की, उरण विधानसभा मतदारसंघासाठी १६० कोटी रुपये मंजूर केले आहेत. इरसाळ वाडीतील वेदना मला जाणवल्या आहेत. मोरबे धरणाखालील प्रश्नही सोडवू. चौकमध्ये प्रशस्त सभामंडप, मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जाईल. गाव सुजलाम सुफलाम करू.

माजी आमदार देवेंद्र साटम यांनी चारही ग्रामपंचायतींमध्ये भाजपचे थेट सरपंचपदाचे उमेदवार निवडून येतील, असा विश्वास व्यक्त केला.

शिवसेनेचे उपनेते विजय चौगुले म्हणाले की, सध्या राज्यात जनतेचे सरकार आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री वेळ देणारे आहेत. आता आपले प्रशांतदादा ठाकूर मंत्री व्हावेत.

भाजप तालुकाध्यक्ष रामदास ठोंबरे यांनी सांगितले की, आमदार महेश बालदी यांनी चौक परिसरात विकासनिधी नऊ कोटी, तलाव सुशोभीकरण ४.५ कोटी, प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहाचा पुनर्विकास करण्याचा इरादा केला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये सत्ता देऊन विकासासाठी आमदार महेश बालदी यांचे बळ वाढवा.

## नवे वीज मनोरा धोरण शेतकऱ्यांना सक्षम करणार

### सरकारच्या निर्णयाचे भाजपकडून स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अतिउच्चदाब पारेषण वाहिन्यांच्या मनोऱ्यांसाठी जमिनीचा मोबदला देण्याकरिता सुधारित धोरणास मान्यता देण्याच्या शिंदे-फडणवीस सरकारच्या निर्णयाचे प्रदेश भाजपने स्वागत केले आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यास न्याय्य मोबदला मिळून शेतकरी अधिक सक्षम होईलच, शिवाय वीजपुरवठ्याचे जाळेही मजबूत होईल, असा विश्वास भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला आहे.



आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, वीज मनोरा आणि वाहिनी उभारण्यासाठी जमिनीचे अधिग्रहण न करता केवळ जमिनीचा वापर केला जातो. मनोरा उभारताना जमिनीच्या आणि पिकांच्या होणाऱ्या नुकसानीपोटी मोबदला दिला जातो. शिंदे-फडणवीस सरकारने या धोरणात सुधारणा करीत मोबदल्याची रक्कम वाढविली आहे. ६६ केव्ही किंवा त्याहून जास्त दाबाच्या अतिउच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी वापरलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळाचे रेडीरेकनरमधील किंवा मागील तीन वर्षांतील जमीन खरेदी विक्रीच्या आधारे सरासरी दर यापैकी अधिक असलेल्या किमतीच्या दुप्पट दराने मोबदला दिला जाईल. **(पान २ वर..)**

## अंधेरी पोटनिवडणूक; तीन अर्ज दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

अंधेरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी गुरुवार (दि. १३)पर्यंत तीन उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.

राकेश विश्वनाथ अरोरा (क्रांतिकारी जय हिंद सेना) आणि (हिंदुस्तान जनता पक्ष), मिलिंद काशिनाथ कांबळे (अपक्ष) आणि नीना गणपत खेडेकर (अपक्ष) यांनी आपली नामनिर्देशनपत्रे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केली. या मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे विरुद्ध भाजप अशी मुख्य लढत आहे. दरम्यान, ठाकरे गटाच्या उमेदवार ऋतुजा लटके यांचा राजीनामा शुक्रवारी सकाळी ११ वाजेपर्यंत स्वीकारण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने महापालिकेला दिले आहेत.

# उद्धव गटाचे जिल्हाप्रमुख मनोहर भोईरांना धक्का

## पदाधिकारी शिंदे गटात दाखल

**पनवेल : वार्ताहर**

उद्धव ठाकरे यांच्यासमोर आम्ही हलणार नाही. उरण विधानसभा मतदारसंघातील एकही पदाधिकारी कुठे गेला नाही आणि जाणार नाही, अशी वल्गना जिल्हाप्रमुख मनोहर भोईर यांनी पक्षप्रमुखांसमक्ष केली, मात्र काही तासांतच त्यांना धक्का बसला आहे. उलवे शहर प्रमुख मनोज घरत यांच्यासह महिला शहर प्रमुख, शाखा प्रमुख यांनी युवासेनेचे कोअर कमिटी सदस्य रूपेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिंदे गटात प्रवेश केला आहे.

राज्यभर ठाकरे गट आणि शिंदे गटात जोरदार लढाई सुरू असताना ठाकरे गटातून उरण विधानसभेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना मातोश्री निवासस्थानी बोलाविण्यात आले. या वेळी उद्धव ठाकरे यांच्यासमोर बोलताना जिल्हा प्रमुख मनोहर भोईर यांनी, आम्ही हलणार नाही आणि एकही पदाधिकारी कुठे गेला नाहीय व जाणार नाही, अशी वल्गना केली, तर उपस्थित कार्यकर्त्यांनी घोषणा देऊन व टाळ्या वाजवून दाद दिली, मात्र काही तासांतच मनोहर भोईर यांना धक्का बसला.



युवासेनेचे कोअर कमिटी सदस्य रूपेश पाटील यांनी उरण विधानसभा उलवे शहर प्रमुख मनोज घरत, महिला शहर प्रमुख स्नेहल घरत, महिला शाखा प्रमुख व शिवसेना शाखा प्रमुख यांना थेट शिंदे गटात घेऊन उद्धव गटाला धक्का दिला आणि मनोहर भोईर यांच्या नेतृत्वाला खिंडार पाडले. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांनी मनोज घरत आणि अन्य पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले.

या पक्षप्रवेश कार्यक्रमास उरण विधानसभा उपजिल्हा प्रमुख अतुल भगत, खारघर शहर प्रमुख प्रसाद परब उपस्थित होते. काही दिवसांनी प्रत्येक आठवड्यात उरणमधून शिंदे गटात पक्षप्रवेश होणार असल्याचे रूपेश पाटील यांनी या वेळी जाहीर केले.

### नवीन शेव्याचे सरपंचही बाळासाहेबांच्या शिवसेनेत

*__उरण :__ ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहर भोईर यांचे चुलत बंधू आणि नवीन शेवा ग्रामपंचायतीचे सरपंच आदिनाथ भोईर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बाळासाहेबांची शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे. हा पक्षप्रवेश भोईर यांना आणखी एक धक्का आहे. रायगडचे पालकमंत्री उदय सामंत हे अलिबाग येथे आले असता त्यांची सरपंच भोईर यांनी सहकाऱ्यांसह भेट घेतली. या वेळी त्यांनी बाळासाहेबांची शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. मंत्री सामंत यांनी भोईर व त्यांच्या सहकाऱ्यांचे पक्षात स्वागत केले.* **(पान ३ वर..)**

## निवडक

### पाकिस्तानात बसला भीषण आग; १८ पूरग्रस्तांचा मृत्यू

**कराची** : पाकिस्तानमध्ये बसला लागलेल्या भीषण आगीत १८ पूरग्रस्तांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये नऊ महिला आणि आठ लहान मुलांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पुराचे पाणी ओसरल्यानंतर पूरग्रस्त कुटुंब दक्षिणेतील कराचीतून मूळगावी खैरपूर नाथन शाहमध्ये जात असताना ही दुर्घटना घडली.

### मुंबईत दहशतवाद्याला अटक; एटीएसची कारवाई

**मुंबई** : महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) मुंबईतून गुरुवारी (दि. १३) एका दहशतवाद्याला अटक केली. चरतसिंग उर्फ इंद्रजितसिंग करिसिंग (वय ३०) असे या दहशतवाद्याचे असून तो मूळचा पंजाबचा आहे. तो कॅनडामधील वॉंटेड दहशतवादी लखबीरसिंग लांडा याच्या संपर्कात असल्याची माहिती महाराष्ट्र एटीएसने दिली. त्याला पुढील कारवाईसाठी पंजाब पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# नवी मुंबईत फिफा वर्ल्डकप फिव्हर

### पनवेल मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतला सामन्याचा आनंद

**पनवेल : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील नेरूळ येथील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियममध्ये फिफा महिला फुटबॉल विश्वचषक स्पर्धेतील सामने होत आहेत. पनवेल महापालिकेने ते पाहण्याची संधी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना दिली. पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय सामना पाहून विद्यार्थी भारावून गेले.

जागतिक स्तरावर अत्यंत लोकप्रिय खेळ म्हणून फुटबॉल ओळखला जातो. फुटबॉल खेळाचे मुख्य आकर्षण म्हणजे फिफा वर्ल्डकप. या वर्षी भारतात १७ वर्षाखालील फिफा वर्ल्डकपचे आयोजन करण्यात आले असून नवी मुंबईस यजमान शहर म्हणून बहुमान मिळालेला आहे. ही स्पर्धा ११ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत देशातील नवी मुंबई (महाराष्ट्र), मडगाव (गोवा) आणि भुवनेश्वर (ओडिशा) येथे होत असून या स्पर्धेत एकूण १६ देश सहभागी झाले आहेत. **(पान २ वर..)**





# ठाकरे सेनेवर आता लाल रंगाची झालर

## भाजप मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांचे टीकास्त्र



**मुंबई : प्रतिनिधी**

हिंदुत्व हीच ताकद असलेल्या शिवसेनेला हिंदुत्वाच्या मुद्द्यापासून दूर करण्याचा व्यापक कट हिंदुत्वविरोधी राजकीय नेत्यांनी आखला आहे. कम्युनिस्टांनी दिलेला पाठिंबा हा त्या कटाचाच एक भाग असून आता उद्धव ठाकरे यांची शिवसेना या कटात पुरती फसली आहे. शिवसेनेचा भगवा रंग आता लाल झाला आहे, अशी टीका प्रदेश भाजप मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी गुरुवारी (दि. १३) पत्रकार परिषदेत केली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. शिवसेनेने उद्या एमआयएमचा पाठिंबा घेतला तरी आश्चर्य वाटायला नको, असेही उपाध्ये यांनी नमूद केले.

मुंबईतील कम्युनिस्ट नेते आमदार कृष्णा देसाई यांची निर्घृण हत्या झाल्यानंतर शिवसेनेने मुंबईत पाय रोवले होते. कम्युनिस्टांचा प्रभाव संपविणाऱ्या त्याच शिवसेनेवर कम्युनिस्टांचा पाठिंबा घेण्याची वेळ यावी हा काळाने उगवलेला सूड आहे. राजकीय पक्षांना आव्हान देणाऱ्या शिवसेनेकडे हिंदुत्वाच्या विचाराची शक्ती असून ती शक्तीच काढून घेण्याचा एक व्यापक कट या विरोधकांनी रचला. त्याचाच भाग म्हणून अगोदर उद्धव ठाकरे यांचे गोडवे गायिले गेले. मग त्यांना पाठिंबा देऊन हिंदुत्वापासून दूर ओढले गेले. आता ठाकरेंची शिवसेना या कटात पुरती फसल्याचे स्पष्ट झाल्यावर याच कटाचा पुढचा अंक म्हणून उद्धव ठाकरेंना सहानुभूती दाखविण्याचा कांगावा सुरू आहे. आता ठाकरेंची शिवसेना यात पुरती फसल्याचे लक्षात येताच माघारीचे प्रयत्नही करून झाले, पण त्यामध्ये यश न आल्याने हिंदुत्वविरोधी पक्षांचा फसवा आधार घेऊन तगण्याची धडपड सुरू आहे, अशी घणाघाती टीका उपाध्ये यांनी केली.

हिंदुत्व सोडल्यावर शिवसेनेचा भगवा रंग संपला आणि ज्यांनी पाठिंबा दिला त्यांचा रंग शिवसेनेने दाखविला. संभाजी ब्रिगेडसोबत गेल्यावर सावरकरांवर बोलणे बंद झाले. आता तर हिंदुत्वावर न बोलण्याच्या अटीवरच कम्युनिस्टांनी पाठिंबा दिला असून ती अट मान्य केली गेल्याची आमची माहिती आहे, असे उपाध्ये म्हणाले. मित्र म्हणविणाऱ्या या सहानुभूतीदार पक्षांनी आता ठाकरे यांचे पंख पुरते छाटले असून परतीचा मार्गदेखील बंद केला आहे, असेही ते म्हणाले.

# पनवेलमध्ये दोन लाख १० हजार मतदारांचे आधार व्हेरिफिकेशन पूर्ण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघात गुरुवारी (दि. १३) अखेरपर्यंत एक लाख ५० हजार मतदारांचे आधार व्हेरिफिकेशन पूर्ण झाले आहे. तर १९० उरण विधानसभा मतदारसंघातील पनवेल भागात २४ मतदान केंद्रे असून ६० हजार मतदारांचे आधार व्हेरिफिकेशन पूर्ण झालेले आहे. याप्रमाणे पनवेल तालुक्यात दोन लाख १० हजार मतदारांचे आधार व्हेरिफिकेशन पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे पनवेल तालुक्यात आतापर्यंत ३० टक्के आधार जोडणीचे काम पूर्ण झालेले आहे. नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदविल्यास हे काम लवकर पूर्ण होईल. या अनुषंगाने नागरिकांनी मतदान कार्ड आधारला लिंक करावे, असे आवाहन पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी केले आहे.

तहसीलदार विजय तळेकर पुढे म्हणाले, भारत निवडणुक आयोग यांच्या निर्देशांन्वये मतदार यादीमधील मतदारांची ओळख आणि छाननी सुरू आहे. सदरचा कार्यक्रम १ ऑगस्ट २०२२ पासुन संपुर्ण भारतभर सुरू झालेला आहे. १८८ पनवेल विधानसभा मतदासंघामध्ये मतदार यादीचे शुध्दीकरण करण्याच्या दृष्टीने जे मतदार आहेत त्यांचे आधार नंबर मतदार यादीस लिंक करणे किंवा आधार नंबर नसल्यास इतर ओळखपत्र मतदार यादीला लिंक करण्याचे काम सुरू आहे. मतदार यादीचे शुध्दीकरण करणे हा याचा उद्देश आहे. तरी सर्व नागरिकांना पनवेल प्रशासनाच्यावतीने विनंती करतो की जास्तीत जास्त प्रमाणात सहभाग घ्यावा.

याचबरोबर नॅशनल वोटर पोर्टल आणि वोटर हेल्पलाईन आणि इआरओ नेट अश्या वेगवेगळ्या माध्यमातून नागरिकांना आधार नंबर लिंक करता येईल. ज्या नागरिकांना ऑनलाईन लिंक करणे अवघड आहे त्यांच्यासाठी ऑफलाईन सुविधा देखील आहे. यामध्ये ६ब चा फॉर्म भरून बीएलओमार्फत तहसीलदार कार्यालयात दिला तरी आधार लिंक होईल. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी यात सहभाग नोंदवावा असे आवाहन तहसीलदार विजय तळेकर यांनी केले आहे.

यामध्ये नागरिकांना स्वतःदेखील व्हेरिफिकेशन करता येते किंवा त्यांच्या परिसरातील बीएलओ मार्फत करता येईल किंवा तहसीलदार कार्यालयातील निवडणूक विभागातून देखील करता येईल. निवडणूक आयोगाने गरुडा नावाचे मोबाइल ॲप तयार केले आहे हे कोणत्याही अँड्रॉइड फोनवर डाऊनलोड करता येते. या ॲप मधूनदेखील आधार नंबर लिंक करता येतो.

**मतदार यादीला आधार क्रमांक लिंक करणे ही मोहीम केंद्रीय निवडणूक आयोगाने संपूर्ण भारतभर हाती घेतलेली आहे. मतदार यादीला आधार क्रमांक जोडणीसाठी जास्तीत जास्त नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा. हे ऐच्छिक काम असले तरीदेखील मतदार यादी शुद्धीकरण करणे हा यामागील महत्त्वाचा उद्देश आहे. ज्या ठिकाणी आधार क्रमांक नसेल त्या ठिकाणी निवडणूक ओळखपत्र, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन, पासपोर्ट यासारखे ओळखीचे पुरावे अथवा कोणत्याही विभागाचे ओळखपत्र अपलोड करता येऊ शकते. त्यामुळे या मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे.**

**–राहुल मुंडके,**
**उपविभागीय अधिकारी**
**तथा मतदान नोंदणी अधिकारी**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आरोग्य शिबिराला प्रारंभ

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व मेडिकवर हॉस्पिटल खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या आरोग्य शिबिरामध्ये महाविद्यालयातील एफवाय बीकॉम, एफवाय बँफ, एफवाय बी, एससी आयटी व एफवाय बीएससी या सर्व वर्गातील विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय चाचण्या घेण्यात येणार आहेत. या शिबिराचा गुरुवारी (दि. १३) प्रथम वर्षाच्या सुमारे २५० विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या या सर्व आठ चाचण्या यशस्वीरित्या करून घेतल्या.




१४ ऑक्टोबर रोजी महाविद्यालयातील एसवाय बँफ, एफवाय बँफ, एफवाय बीएमएस तसेच एसवाय बीएससी या सर्व वर्गातील विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय चाचण्या घेण्यात येणार आहेत. १७ ऑक्टोबर रोजी एसवाय बीकॉम, एसवाय बीएमएस, एसवाय बीएससी या वर्गातील विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय चाचण्या घेण्यात येणार आहेत. १८ ऑक्टोबर रोजी टीवाय बीकॉम, टीवाय बॅफ, टीवाय बीएमएस, टीवाय बीएससी आयटी या सर्व वर्गातील विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय चाचण्या होणार आहेत. या शिबिरामध्ये मेडिकवर हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या आठ चाचण्या घेण्यार असून त्यामध्ये ब्लड प्रेशर, रँडम ब्लड शुगर, बॉडी कॉम्पोझिशन एनालिसिस, बॉडी मास इंडेक्स, बोन डेन्सिटी, ईसीजी, इ एन टी, ओरल स्क्रीनिंग व आय चेक अप इत्यादी.

या सर्व चाचण्यांचा फायदा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना होणार आहे. प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तसेच सर्व विद्यार्थ्यांना या सर्व आठ चाचण्या करण्यासाठी प्रोत्साहन दिले व आजच्या धावपळीच्या जीवनातील आरोग्याचे व वैद्यकीय तपासणीचे महत्व पटवून दिले. या आरोग्य शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे विभाग प्रमुख प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी आयोजन केले व प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. भाग्यश्री शुक्ला, प्रा. राजश्री म्हात्रे प्रा. प्रतीक्षा पाटील, प्रा. कावेरी घोगरे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# १३ बळी घेणारा नरभक्षी वाघ जेरबंद

**भंडारा : प्रतिनिधी**

एक-दोन नव्हे तर तब्बल १३ जणांचा बळी घेणाऱ्या 'सीटी १' या नरभक्षी वाघाला जाळ्यात अडकविण्यात वनविभागाला यश आले आहे. मागील तीन महिन्यांपासून या वाघाला पकडण्यासाठी वन विभागाचे प्रयत्न सुरू होते.

'सीटी १' या नरभक्षी वाघाने भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या तीन जिल्ह्यांमध्ये धुमाकूळ घातला होता. ताडोबा अभयारण्यातील विशेष पथक या वाघाला पकडण्यासाठी प्रयत्न करीत होते, परंतु तीन महिन्यांपासून हा वाघ हुलकावणी देत होता. या वाघाला गडचिरोली जिल्ह्यातील वडसा येथे गुरुवारी (दि. १३) सकाळी जेरबंद करण्यात आले.

'सीटी १' या वाघाने आतापर्यंत १३ लोकांची शिकार केली आहे. त्यामुळे परिसरातील लोक दहशतीखाली वावरत होते. दोन दिवसांपूर्वी देसाईगंज जवळच्या एका गाईवर या वाघाने हल्ला केला. त्यामुळे तेथेच वनविभागाची टीम पाळत ठेवून होती. ताडोबा येथील टीमने या वाघाला गुरुवारी सकाळी सापळ्यात अडकविले. त्याच्यावर बेशुद्धीचे इंजेक्शन डागण्यात आले. त्यानंतर त्याला पकडण्यात आले. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

# 'बिर्ला'कडून १८९ विद्यार्थ्यांची दंत तपासणी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील तळवली गावाजवळील बिर्ला कार्बन इंडिया प्रा. लि. यांच्या सामाजिक बांधिलकी सी एस आर उपक्रमात दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

हे शिबिर रायगड जिल्हा परिषद केंद्र शाळा चौक व रायगड जिल्हा परिषद केंद्र शाळा सारंग येथे गुरुवारी आयोजित करण्यात आले होते. या वेळी डॉ. आनंद शहा आणि त्यांच्या टीमने शाळेतील एकूण १८९ विद्यार्थ्यांची दंत तपासणी करून प्रत्येक विद्यार्थ्याला ब्रश व कोलगेट टूथपेस्ट देण्यात आली.

या कॅम्पचे आयोजन बिर्ला कार्बन कंपनीचे समाज विकास अधिकारी लक्ष्मण मोरे यांनी केले होते. या शिबिराला चौक व सारंग शाळेच्या शिक्षकवर्गाने सहकार्य केले.

# पनवेलमध्ये आज नवउद्योजिका पुरस्कार सन्मान सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ गॅलेक्सी न्यू पनवेल आणि कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने नवद्योजिका पुरस्कार सन्मान सोहळा शुक्रवारी (दि. १४) पनवेलमध्ये आयोजिण्यात आला आहे. उद्योग-व्यवसायात आदर्श निर्माण करणाऱ्या नवउद्योजिकांचा या वेळी पुरस्कार देऊन सत्कार केला जाणार आहे.

पनवेलच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शुक्रवारी रात्री ८ वाजता हा समारंभ होणार असून भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तहसीलदार विजय तळेकर, कोकण मराठी साहित्य परिषदेचे जनसंपर्कप्रमुख रायगडभूषण प्रा. एल. बी. पाटील, इनरव्हील डिस्ट्रिक्ट चेअरमन (३१३) मुक्ती पानसे उपस्थित राहणार आहेत. या समारंभात २५हून अधिक नवउद्योजिकांचा पुरस्कार देऊन सन्मान केला जाणार आहे तसेच विशेष लक्षवेधी सत्कार केले जाणार आहेत. यानिमित्ताने मराठी व हिंदी गाण्यांची मैफिल होईल. समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन इनरव्हील क्लब ऑफ गॅलेक्सी न्यू पनवेलच्या अध्यक्ष साधना धारगळकर, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी व रंगनील नाट्य संस्थेच्या अध्यक्ष कल्पना कोठारी यांनी केले आहे.

# डोंबिवलीमध्ये रंगणार आगरी महोत्सव

**पनवेल : प्रतिनिधी**

अठरावा अखिल भारतीय आगारी महोत्सव नव्या ढंगात, नव्या रंगात १२ ते १९ डिसेंबर रोजी डोंबिवली येथे होणार असल्याची माहिती संयोजन समितीचे अध्यक्ष गुलाब वझे यांनी दिली. एक आनंदाची पर्वणी घेऊन या होत्सवात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या आगरी युथ फोरम या सेवाभावी संस्थेमार्फत कोरोनाच्या दोन वर्षांच्या विश्रांतीनंतर अठरावा अखिल भारतीय आगरी महोत्सव १२ ते १९ डिसेंबरदरम्यान श्री संत सावळाराम महाराज क्रीडासंकुल डोंबिवली (पूर्व) येथे होणार आहे. यामध्ये ज्वलंत सामाजिक विषयांवर प्रसिध्द विचारवंतांची व्याख्याने, परिसंवाद आणि चर्चासत्र आयोजित करण्यात आली आहेत. मनोरंजनासाठी प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शकांच्या मार्गदर्शनाखाली हौशी कलाकारांच्या बहारदार नृत्य गीतांचे कार्यक्रम नामवंत राजकीय, सामाजिक, साहित्यिक व कला, क्रीडा क्षेत्रातील नामवंत मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहेत.

या महोत्सवात खरेदीदारांसाठी विविध गृहपयोगी वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, आगरी समाजच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे स्टॉल, वैशिष्ट्यपूर्ण सुकी मासळी, आगरी पध्दतीच्या खाद्यपदार्थांचे स्टॉल तसेच सामजिक संस्थांचेही स्टॉल असणार आहेत. लहान मुलांना खेळण्यासाठी आकाश पाळणे व इतर साधने उपलब्ध असतील.

महोत्सवाच्या संयोजन समितीचे अध्यक्ष गुलाब वझे यांचे मार्गदर्शनाखाली कार्याध्यक्ष जालिंदर पाटील, उपाध्यक्ष विश्वनाथ रसाळ, सरचिटणीस रामकृष्ण पाटील, खजिनदार पांडुरंग म्हात्रे, सचिव प्रकाश भंडारी, शरद पाटील, गुरूनाथ म्हात्रे, सर्व सल्लागार व त्यांचे सहकारी महोत्सव यशस्वी करण्यासाठी मेहनत घेत आहेत. या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्ष वझे यांनी केले आहे.

पान १ वरून

## रायगडच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध

जिल्हा नियोजन भवनात झालेल्या या बैठकीस खासदार श्रीरंग बारणे, सुनील तटकरे, आमदार सर्वश्री प्रशांत ठाकूर, रविशेठ पाटील, जयंत पाटील, महेश बालदी, भरत गोगावले, महेंद्र थोरवे, महेंद्र दळवी, आदिती तटकरे, बाळाराम पाटील, अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, रोहा उपवनसंरक्षक अप्पासाहेब निकत, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद शिंदे, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहत्रे आदी उपस्थित होते.

या बैठकीत मागील बैठकीचे इतिवृत्त व त्यावरील कार्यवाहीच्या अहवालास समितीमार्फत मान्यता देण्यात आली. सन २०२२-२३चा प्रारूप आराखडा व सन २०२१-२२ अंतर्गत जानेवारी २०२२अखेरील खर्चाचा आढावा समितीसमोर मांडण्यात आला. लोकप्रतिनिधी व समिती सदस्यांमार्फत प्रलंबित विषयांचा निपटारा होण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने केलेली अंमलबजावणी व अंतिम टप्प्यात असलेल्या विविध उपाययोजना त्वरित पूर्णत्वास न्याव्यात, अशा सूचना पालकमंत्री उदय सामंत यांनी दिल्या. उपस्थित लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या विविध विषयांवर जिल्हा प्रशासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हा वार्षिक नियोजनच्या निधीतून सर्वांनी मिळून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देऊया यासाठी सर्व पदाधिकारी आणि अधिकारी यांचे योगदान निश्चितच महत्त्वाचे राहणार आहे, असेही पालकमंत्री सामंत म्हणाले.

या वेळी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी पालकमंत्री उदय सामंत व उपस्थित लोकप्रतिनिधींनी सूचित केलेल्या बाबींबाबत तातडीने संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन तत्काळ आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असे सांगितले.

जिल्हा नियोजन अधिकारी यांनी उपस्थित समिती सदस्यांना जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीबद्दल माहिती देताना सांगितले की, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२करिता २७५ कोटी रुपये इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून प्राप्त निधीपैकी २७५ कोटी रुपये इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी सप्टेंबर २०२२अखेर १८१.६१ कोटी रुपये इतका निधी खर्च करण्यात आला असून खर्चाची टक्केवारी ६६ टक्के इतकी आहे.

अनुसूचित जाती उपयोजनांतर्गत सन २०२१-२२मध्ये एकूण २५.६० कोटी रुपये निधी अर्थसंकल्पित करण्यात असून प्राप्त निधीपैकी २५.६० कोटी रुपये इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी सप्टेंबर २०२२अखेर २५.६० कोटी रुपये इतका निधी खर्च करण्यात आला असून खर्चाची टक्केवारी १०० टक्के इतकी आहे.

आदिवासी उपयोजनांतर्गत सन २०२१-२२मध्ये एकूण ३२.९८ कोटी रुपये निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून प्राप्त निधीपैकी ३२.९८ कोटी रुपये इतका निधी आतापर्यंत वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी सप्टेंबर २०२२ अखेर १८.१५ कोटी रुपये इतका निधी खर्च करण्यात आला असून खर्चाची टक्केवारी ५५ टक्के रुपये इतकी आहे.

सन २०२१-२२मध्ये कोविड १९ अंतर्गत प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ५१.८३ कोटी रुपये रकमेच्या प्रशासकीय मान्यता देऊन ५६.७० कोटी रुपये निधी वितरीत करण्यात आला असून सप्टेंबर २०२२अखेर ३८.३९ कोटी रुपये इतका निधी खर्च करण्यात आला असून खर्चाची टक्केवारी ६७.७ टक्के इतकी आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२मध्ये नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत ८.५६ कोटी रकमेच्या प्रशासकीय मान्यता देऊन ८.१८ कोटी रुपये निधी वितरीत करण्यात आला असून सप्टेंबर २०२२अखेर ४.९९ कोटी रुपये इतका निधी खर्च करण्यात आला असून खर्चाची टक्केवारी ६१ टक्के इतकी आहे.

सन २०२१-२२ अंतर्गत सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत एकूण ६२.७२ कोटी रुपये, अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत १.२० कोटी रुपये व आदिवासी उपयोजनेंतर्गत ६.५६ कोटी रुपये असे मिळून ७०.४८ कोटी रुपये इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यात आले आहे. त्यात सर्वसाधारण योजना-महसूली बचत ५०.१४ कोटी रुपये, भांडवली बचत १२.५८ कोटी रुपये, महसूली वाढ ५०.१४ कोटी रुपये, भांडवल वाढ १२.५८ कोटी रुपये मिळून ६२.७२ कोटी रुपये; अनुसूचित जाती उपयोजना-महसूली बचत १.२० कोटी रुपये, भांडवली बचत निरंक, महसूली वाढ १.२० कोटी रुपये, भांडवल वाढ निरंक असे मिळून १.२० कोटी रुपये, तर आदिवासी उपयोजना-महसूली बचत ४.२० कोटी रुपये, भांडवली बचत २.३६ कोटी रुपये, महसूली वाढ ४.२० कोटी रुपये, भांडवल वाढ २.३६ कोटी रुपये मिळून ६.५६ कोटी रुपये असे एकूण महसूली बचत ५५.५४ कोटी रुपये, भांडवली बचत १४.९४ कोटी रुपये, महसूली वाढ ५५.५४० कोटी रुपये, भांडवल वाढ १४.९४ कोटी रुपये आणि सर्व मिळून एकूण ७०.४८ कोटी रुपये अशी आकडेवारी आहे..

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत केलेल्या पुनर्विनियोजनापैकी कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी ४७.०३ कोटी रुपये रकमेचे पुनर्विनियोजन करण्यात आले आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ३२० कोटी रुपये तरतूद मंजूर करण्यात आली असून ९५.३२ कोटी रुपये इतका निधी प्राप्त झाला आहे. अनुसूचित जाती उपयोजनेसाठी २५.६४ कोटी रुपये तरतूद मंजूर असून ३.५२ कोटी रुपये निधी प्राप्त झाला आहे. आदिवासी उपाययोजनेसाठी ४१.०६ कोटी रुपये तरतूद मंजूर असून ८.६२ कोटी रुपये निधी प्राप्त झाला आहे. त्यात सर्वसाधारण योजना-अर्थसंकल्पीय तरतूद ३२० कोटी रुपये, प्राप्त तरतूद ९५.३२ कोटी रुपये, वितरीत निधी १२.४१ कोटी रुपये; अनुसूचित जाती उपयोजना-अर्थसंकल्पीय तरतूद २५.६४ कोटी रुपये, प्राप्त तरतूद ३.५२ कोटी रुपये, वितरीत निधी १.२८ कोटी रुपये; आदिवासी उपयोजना-अर्थसंकल्पीय तरतूद ४१.०६ कोटी रुपये, प्राप्त तरतूद ८.६२ कोटी रुपये, वितरीत निधी ०.९९ कोटी रुपये असे मिळून एकूण अर्थसंकल्पीय तरतूद ३८६.७० कोटी रुपये, प्राप्त तरतूद १०७.४६ कोटी रुपये व वितरीत निधी १४.६८ कोटी रुपये आहेत.

## नवे वीज मनोरा धोरण शेतकऱ्यांना सक्षम करणार

सरकारच्या या निर्णयामुळे पारेषण कंपन्याचे रखडलेले विविध प्रकल्प मार्गी लागून मनोरा आणि वाहिनी उभारणी वेगाने होऊन वीजनिर्मितीस मदत होईल, असे ते म्हणाले. याबरोबरच मनोऱ्यातून जाणाऱ्या वाहिन्यांच्या पट्ट्याखालील येणाऱ्या क्षेत्रासाठी अतिरिक्त १५ टक्के तसेच रेडीरेकनर किंवा सरासरी दर यापैकी जो दर अधिक असेल त्या दराच्या १५ टक्के असा एकूण ३० टक्के मोबदला दिला जाईल. मनोऱ्याने बाधित झालेल्या जमिनीचा मोबदला थेट संबंधित शेतकरी तसेच जमीन मालकाच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

## नवी मुंबईत फिफा वर्ल्डकप फिव्हर

प्रत्येक दिवशी दोन याप्रमाणे पाच दिवसांत एकूण १० फुटबॉल सामन्यांचे नियोजन नवी मुंबईत करण्यात आले आहे. अंतिम सामनाही नेरूळच्या डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर रंगणार आहे. पनवेल महापालिकेतील शालेय विद्यार्थ्यांनाही हे सामने पाहता यावेत यासाठी आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सामन्यांचे पासेस उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्याचा लाभ घेत हा सामन्यांचा आनंद विद्यार्थ्यांनी लूटला. पनवेल महापालिकेचे शिक्षण विभाग प्रमुख बाबासाहेब चिमणे यांच्या नियोजनाखाली यापुढील सामनेही विद्यार्थ्यांना पाहता येणार आहेत.

# निवडक

## शिरढोण येथे एकाची आत्महत्या

**पनवेल :** मानसिक तणावाखाली येऊन एका व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना तालुक्यातील शिरढोण येथील श्री बालाजी हॉटेल आणि लॉज येथे घडली. दीपक कटबू (वय ४०, रा. मुंब्रा) याने मानसिक तणावातून श्री बालाजी हॉटेल आणि लॉजमधील रूम नं १०४ येथे पंख्याला नॉयलॉनच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. याबाबतची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## घरफोडीमुळे रहिवासी भयभीत

**पनवेल :** सुकापुर येथील ओम शिवा कॉम्प्लेक्समध्ये दोन घरफोड्या झाल्याने रहिवासी भयभीत झाले आहे. ओम शिवा कॉम्प्लेक्स येथे राहणाऱ्या सुनिता सदाशिव पाटणकर (रूम नंबर १०१) व पंडित डेरे (रूम नंबर २०२ ए विंग) या दोन्ही घरांमध्ये कोणीही नसल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल घेऊन पोबारा केला आहे. या घटनेची माहिती खांदेश्वर पोलिसांना मिळताच गुन्हे शाखेची पथके यांनी घटना स्थळी दाखल झाल होते. गेल्या काही दिवसांपासून पनवेल परिसरात घरफोडीचे सत्र वाढत असल्याचे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

## करंजाडे येथून एक जण बेपत्ता

**पनवेल :** तू घरी निघुन जा, मी नंतर येतो असे सांगून गेलेला पती परत न आल्याने तो हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.



स्नेहील केशवराव वासनिक (वय ३८, रा. करंजाडे) असे या व्यक्तीचे नाव असून त्याची उंची पाच फुट पाच इंच, रंग सावळा, केस काळे, डोळे- काळे, नाक सरळ, चेहरा उभट, बांधा मध्यम, अंगात ऑफ व्हाइट शर्ट, निळी जिन्स व पायात काळी चप्पल घातलेली आहे. त्याच्या कपाळाला डाव्या बाजुला जखमेचा व्रण असून त्याला मराठी व हिंदी भाषा बोलता येते. या व्यक्तबाबत कोणाला काही माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार सचिन जाधव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## घरातून मोबाइलची चोरी

**पनवेल :** घराच्या अर्धवट उघड्या दरवाज्याची सेफ्टी चैन काढून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून घरात असलेला सॅमसंग गॅलॅक्सि कंपनीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना शहरातील नर्मदा कॉम्प्लेक्स येथे घडली आहे. वसंत काजरोळकर यांच्या घराचा अर्धवट उघड्या दरवाज्याची सेफ्टी चैन काढून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. त्याने घरात असलेला सॅमसंग गॅलॅक्सि कंपनीचा मोबाइल (किंमत २३ हजार) चोरून नेला आहे. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# नवीन शेव्याचे सरपंच 'बाळासाहेबांची शिवसेने'त





## पालकमंत्री उदय सामंतांच्या उपस्थितीत प्रवेश

**उरण : रामप्रहर वृत्त**

ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहर भोईर यांचे चुलत बंधू आणि नवीन शेवा ग्रामपंचायतीचे सरपंच आदिनाथ भोईर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बाळासाहेबांची शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे. हा पक्षप्रवेश भोईर यांना धक्का असल्याची चर्चा उरण तालुक्यात होत आहे.

रायगडचे पालकमंत्री उदय सामंत हे अलिबाग येथे आले असता त्यांची सरपंच आदिनाथ भोईर यांनी सहकाऱ्यांसह भेट घेतली. या वेळी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बाळासाहेबांची शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. मंत्री सामंतांनी भोईर व त्यांच्या सहकाऱ्यांचे पक्षात स्वागत केले.

या वेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र थोरवे, बाळासाहेबांची शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख (उरण विधानसभा) अतुल भगत आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सरपंच आदिनाथ भोईर यांच्यासह हेमंत घरत, बळवंत वामन भोईर, भावेश भारत भोईर, मनोज तुकाराम ठाकूर, जमिर शरिफ शेख, धनूष हिराजी पाटील व अन्य सहकाऱ्यांनी बाळासाहेबांची शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे.

## आष्टे लॉजिस्टीकच्या गुडविल कंटेनर सर्व्हिसेसमधील
# सर्व्हेअर कामगारांना भरघोस पगारवाढ

### जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून करारांचा धडाका



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आष्टे लॉजिस्टीकच्या गुडविल कंटेनर सर्व्हिसेसमधील सर्व्हेअरचा काम करणाऱ्या कामगारांना भरघोस पगारवाढीचा करार जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून करण्यात आला.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कामगार नेते जितेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून आष्टे लॉजिस्टीकमधील गुडविल कंटेनर सर्व्हिसेसमधील कामगारांचा पगारवाढ व इतर सोयीसुविधांचा करार रायगड जिल्हा कामगार उपायुक्त प्रदीप पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या दालनात झाला. तीन वर्षांच्या झालेल्या करारानुसार कामगारांना १० हजार रुपयांची पगारवाढ करण्यात आली त्यामध्ये पहिल्या वर्षी प्रती महिना चार हजार रुपये त्यानंतर नंतर दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी प्रत्येकी तीन हजार रुपयांची पगारवाढीचा समावेश आहे. तसेच दोन लाख रुपयांपर्यंत मेडीक्लेम पॉलिसी, सुट्ट्या, बोनस अशा अनेक सोयी सुविधांचा समावेश आहे.

या करारावर संघटनेच्या वतीने अध्यक्ष जितेंद्र घरत, सचिव विनायक मुंबईकर, कार्यालयीन सचिव समिरा चव्हाण, संघटक रवींद्र कोरडे यांनी स्वाक्षरी केली तर व्यवस्थापनाच्या वतीने विपीन पिटालिया व कांतिलाल पाटील यांनी स्वाक्षरी केली. सहा महिन्यांपासून प्रलंबित असणारा या कराराबाबत मध्यस्थी करण्यासंदर्भात संघटनेने सहाय्यक कामगार उपायुक्त शितल कुलकर्णी यांच्याकडे रितसर पत्र देवून विनंती केली. त्यामध्ये शितल कुलकर्णी यांनी मोलाची भूमिका घेवून संघटना व व्यवस्थापनाला मोलाचे मार्गदर्शन करून हा करार पूर्ण केला. या वेळी कामगार प्रतिनिधी योगेश गायकर, मदन पाटील, सचिन कुलकर्णी, प्रशांत पाटील, अतुल नाईक आदी उपस्थित होते.

## दिघाटीत नळ पाणीपुरवठा योजनेचा शानदार शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर नल, हर घर जल'नुसार दिघाटी गावात ४० लाख रुपयांची नळ पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत असून या विकासकामाचे भूमिपूजन गुरुवारी (दि. १३) झाले.

भूमिपूजनावेळी सरपंच अमित पाटील, उपसरपंच रोहिदास शेडगे, केळवणे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष हिरामण ठाकूर, माजी उपसरपंच दत्तात्रेय पाटील, भाजप नेते चांगाजी पाटील, प्रमोद पाटील, पोलीस पाटील चंद्रकांत पाटील, बळीराम गावंड, ज्येष्ठ नेते भाऊ ठाकूर अजय पाटील, भाजप कार्यकर्ते मच्छिंद्र पाटील, अर्जुन ठाकूर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

जलजीवन मिशन अंतर्गत सुरू झालेल्या या योजनेमुळे दिघाटी आणि परिसरातील नागरिकांना स्वच्छ आणि शुद्ध पाणी देण्याचा संकल्प लवकरच पूर्ण होईल.



## पनवेल महापालिका राबविणार स्वच्छताविषयक कार्यक्रम

**पनेवल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात 'स्वच्छ भारत'सर्वेक्षण २.० मोहिमेंतर्गत कचरा विलगीकरणाचे महत्त्व नागरिकांना पटवून देण्याकरिता 'स्वच्छता का उपहार' हा कार्यक्रम १६ ते २२ ऑक्टोबर या दरम्यान राबविण्यात आहे. या अंतर्गत आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छता के दो रंग हरा गिला, सुखा निला'या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

'स्वच्छता के दो रंग हरा गिला, सुखा निला'या उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांना ओला कचरा व सुक्या कचऱ्याचे विलगीकरणाचे महत्त्व पटवून सांगण्यात येणार आहे. ओला कचरा व सुका कचरा वेगळा केला असता ओल्या कचऱ्यापासून चांगल्या पध्दतीने कंपोस्ट खत व सुक्या कचऱ्यापासून पुर्नवापर करणाऱ्या वस्तू तयार करता येतात. याचेच महत्त्व मुलांना पटवून सांगण्यासाठी पालिकेचे प्रतिनिधी महापालिका क्षेत्रातील विविध शाळांमध्ये जाणार आहेत. याचबरोबर स्वच्छता निरीक्षक घरोघरी जाऊन तसेच पोस्टर, बॅनरच्या माध्यमातून ओल्या व सुक्या कचऱ्याविषयी जनजागृती करणार आहेत.

या उपक्रमाचे नियोजन करण्याकरिता घनकचरा आणि आरोग्य विभागाची बैठक गुरुवारी (दि. १३) घेण्यात आली. या वेळी सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, विभागप्रमुख अनिल कोकरे, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमामध्ये इन्फिनीटी फाऊंडेशन महापालिकेस सहाय्य करणार आहे. या फाऊंडेशनचे अध्यक्ष आयुफ आकुला व सदस्य या बैठकीस उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या जनजागृतीसाठी महापालिका क्षेत्रातील शाळांचे मुख्याध्यापक, विविध एनजीओ, बचतगटांच्या महिला, विविध सोसायट्यांमधील प्रतिनिधी यांच्याही कार्यशाळेचे नियोजन आजच्या बैठकीत करण्यात आले.

## उरणमध्ये मंगळवारी वैद्यकीय शिबिर

**उरण : प्रतिनिधी**

जिल्हा प्रशासन आणि रायगड जिल्हा आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आणि इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण यांच्या सौजन्याने माता सुरक्षीत तर घर सुरक्षीत अभियांतर्गत उरण बोरी येथील साई संस्थेच्या नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये मंगळवारी (दि. १८) वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

पूर्णपणे मोफत असणाऱ्या या वैद्यकीय शिबिरांतर्गत माता, स्तनदा माता, किशोर वयीनमुलींना विशेष मार्गदर्शन करण्यात येऊन त्यांच्या समस्यांचे निरसन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे. या तपसणी अंतर्गत रक्तदाब, ब्लड शुगर (मधुमेह), सीबीसी, थायरॉईड फंक्शनल टेस्ट, लिव्हर फंक्शनल टेस्ट (एलएफटी-लिव्हर), लिपीड प्रोफाईल(चॉलेस्टेरॉल), रीनल फंक्शनल टेस्ट (आरएफटी-किडनी), आर. ए. फॅक्टर आदींची तपासणी करण्यात येणार आहे.

यासाठी इंदिरा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. बाबासो कळेल आणि त्यांची सर्व टीम आणि या क्षेत्रांतील तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहणार आहेत. हे शिबिर सकाळी १० ते १२.३० व दुपारी १.३० ते ४ वाजेपर्यंत असे दोन सत्रात होणार आहे. जास्तीत जास्त नगारकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन साई संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील व इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. बाबासो काळेल यांनी केले आहे.

## आरोग्य महाशिबिर : यापूर्वी झालेल्या उपक्रमाची चित्रझलक

### यंदाचे शिबिर रविवार दि. १६ ऑक्टोबर २०२२ रोजी











भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दरवर्षी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भाजप पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबिर आयोजित करण्यात येते. गेली दोन वर्षे कोरोना संसर्गामुळे हे महाशिबिर होऊ शकले नाही. यंदा येत्या रविवारी (दि. १६) ते होत आहे. या पार्श्वभूमीवर आधीच्या महाशिबिरांची चित्रमय झलक...

# विद्यार्थ्यांकडून अंकुरित बीजांची लागवड

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा उपक्रम





**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे गुरुवारी (दि. १३) वनस्पती शास्त्र विभागातर्फे खारघर येथील पांडवकडा येथे अंकुरित बीजांची लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी वनस्पतीशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या बीजांचे अंकुरण केले व त्या अंकुरित बीजांना पांडवकडा येथे जाऊन त्यांचे रोपण करण्यात आले. या कार्यक्रमादवारे विद्यार्थ्यांनी बीजांचे अंकुरण होण्यासाठी लागणाऱ्या परिस्थितीचा आढावा घेतला व त्यासाठी अनुकुल परिस्थतीचे व अंकुरणाच्या प्रक्रियेचे निरिक्षण केले. वनस्पतीशास्त्र विभागातील १७ विद्यार्थी या कार्यक्रमामधे सहभागी झाले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले, तसेच विविध उपक्रम राबवावे यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन वनस्पतीशास्त्र विभागाच्या डॉ. शुभांगी यांनी केले. तसेच प्रा. सफिना मुकादम, प्राजक्ता करवडे यांनी सहकार्य केले.

या उपक्रमाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व सचिव डॉ. सिदेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

संपादकीय

## काय खरे, काय खोटे?

निव्वळ सहानुभूतीच्या लाटेवर स्वार होऊनच जर का कुणी आपली पुढील राजकीय वाटचाल आखताना दिसत असेल तर संशय घेण्यास निश्चितच जागा आहे. ठाकरे गटाला ऋतुजा लटके यांना अंधेरीच्या पोटनिवडणुकीत खरोखरच उमेदवारी द्यायची आहे वा नाही याबद्दल पार्श्वभूमीच प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. लटके यांना हेतुपुरस्सर लटकवून ठेवून भाजप आणि प्रशासनावर खापर फोडायचे अशी रणनीती या साऱ्यामागे आहे वा नाही हे लवकरच स्पष्ट होईल.

अंधेरीच्या पोटनिवडणुकीवरून सुरू असलेले रणकंदन काही केल्या थांबण्याचे नाव घेताना दिसत नाही. अद्याप उमेदवारांनी अर्जही दाखल केलेला नसताना ही स्थिती आहे तर प्रचार सुरू झाल्यानंतर आरोप-प्रत्यारोपांची आणखी किती राळ उडेल याची कल्पनाच केलेली बरी. शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने आपल्या संभाव्य उमेदवार ऋतुजा लटके यांच्या पालिकेतील नोकरीच्या राजीनाम्याचे प्रकरण थेट उच्च न्यायालयात नेले. वास्तवत: कुठल्याही नोकरीत राजीनामा दिल्यानंतर मंजुरीसाठी महिनाभराची नोटीस अशी अट सर्वसाधारणपणे असतेच. मुंबई महापालिकेनेही ऋतुजा लटके यांच्या राजीनाम्याबाबत नोटीस कालावधीवरच बोट ठेवले तर त्यात काय चुकले? त्यांनी ३ ऑक्टोबरला राजीनामा पालिकेत सुपुर्द केला. त्यानंतर काही काळाने त्यांनी एक महिन्याच्या पगाराची रक्कमही जमा केली असा त्यांचा दावा आहे, परंतु एखाद्या कर्मचाऱ्याविरुद्ध भ्रष्टाचाराचे प्रकरण असल्यास त्याची चौकशी केल्याशिवाय त्या कर्मचाऱ्याचा राजीनामा संस्था कसा बरे मंजूर करू शकेल? तसे केल्याने ती संस्थाच पुढे अडचणीत येणार नाही का? लटके यांच्या विरोधातील भ्रष्टाचाराची ही तक्रार १२ ऑक्टोबरलाच दाखल झाली असून ती दाखल होण्याची वेळ लक्षात घेता तक्रार खोटी वाटते असा दावा लटके यांच्या वकिलांनी उच्च न्यायालयासमोर केला. श्रीमती लटके या शिवसेनेचे दिवंगत आमदार रमेश लटके यांच्या पत्नी असून त्या महापालिकेत नोकरीवर असल्या तरी त्या पालिकेत येतच नव्हत्या. उलट या नोकरीचा वापर त्या 'संपर्का'करिता करत होत्या असाही आरोप केला गेला आहे. आता हा संपर्क कशाप्रकारचा असू शकतो हे सूज्ञांना कळलेच असेल. मुंबई महापालिका गेली काही वर्षे निव्वळ भ्रष्टाचाराचे कुरण बनले आहे हे तर यापूर्वी असंख्य वेळा अनेकांनी म्हटले आहे. लटके यांच्या विरोधातील आरोपांमध्ये तथ्य आहे अथवा नाही हे चौकशीविना कसे कळणार? अर्थात आता उच्च न्यायालयाने लटके यांचा राजीनामा उद्या शुक्रवारी ११ वाजेपर्यंत स्वीकारा असा आदेशच दिला आहे. त्यामुळे याप्रकरणी पालिका काय भूमिका घेते ते लवकरच कळेल. लटके यांच्या राजीनामाप्रकरणी पालिका प्रशासन शिंदे-फडणवीस सरकारच्या दबावाखाली ठाकरे गटाची कोंडी करणारी भूमिका घेत असल्याचा आरोप ठाकरे गटाकडून करण्यात आला, परंतु न्यायालयाने त्यांना अनुकूल असा निकाल दिल्यानंतर मात्र त्याचे वर्णन 'न्यायालयाकडून दिलासा' असे करण्यात आले. हा निकाल विरोधात गेला असता तर पुन्हा त्याला राजकीय कोंडी असेच संबोधले गेले असते. कुठल्याही बाबी आपल्याला अनुकूल अशा घडल्या नाहीत की देशात लोकशाही शिल्लकच कुठे आहे असा रडका सूर लावायचा हे आता नित्याचे झाले आहे. लटके यांच्या राजीनाम्याचे अवघे प्रकरण ही विरोधकांची नौटंकी असल्याचा आरोप शिंदे गटाचे मंत्री दीपक केसरकर यांनी केला आहे. हा नौटंकीचा संशयही कुणाला आल्यास त्यात वावगे ते काय?

# लम्पी चर्मरोग आणि शासनाच्या उपाययोजना

राज्यासह देशात अनेक दिवसांपासून पशुधनाला लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. लम्पी चर्मरोगाबाबत समाज माध्यमांमधून काही अफवा पसरविल्या जात आहेत. राज्य शासनाने अनेक प्रकारच्या उपाययोजना केलेल्या आहेत. पशुपालकांना शासनाने केलेल्या उपाययोजनांची माहिती व्हावी, त्यांचे गैरसमज, अंधश्रद्धा दूर करण्यासाठीचा लेख...



लम्पी चर्मरोग हा केवळ गोवंश वर्गातील जनावरांना होणारा विषाणूजन्य त्वचारोग आहे. हा रोग कीटकांपासून पसरतो. हा आजार गाई व बैलांपासून किंवा गाईच्या दुधापासून मानवामध्ये संक्रमित होऊ शकत नाही. शासनाने राज्यातील प्रत्येक पशुवैद्यकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रातील भागात सरसकट लसीकरण करण्यासाठी परवानगी दिली आहे. लम्पी चर्मरोग राज्य शासनाने केलेल्या प्रभावी उपाययोजनेमुळे घटत आहे. राज्यात सध्या बाधित पशुधनापैकी ५० टक्के पशुधन उपचाराने बरे झाले आहेत. संपूर्ण राज्यात लम्पी आजाराबाबत दक्षतेचा इशारा प्रशासनाला दिला आहे. राज्यातील ३१ जिल्ह्यांत या आजाराचा पशुधनात शिरकाव झाला आहे. अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात आपण वेळीच खबरदारी व उपाययोजना सुरु केल्याने लम्पी आजार नियंत्रणात आहे. पशुपालकांनी, शेतकऱ्यांनी घाबरून न जाता शासनाच्या सूचनाप्रमाणे काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

लम्पी चर्मरोग नियंत्रण करण्याकरिता पशुधन पर्यवेक्षकाची २८६ रिक्त पदे आणि जिल्हा परिषद स्तरावरील पशुधन पर्यवेक्षकाची ८७३ अशी ११५९ पदे बाह्यस्रोताद्वारे भरण्यात येणार आहे. लम्पी आजारामुळे ज्या पशुपालकांनी आपली जनावरे गमावली आहेत त्यांच्यासाठी शासनातर्फे अर्थसहाय्य केले जात आहे. यात दुभत्या गायीसाठी ३० हजार रुपये, शेतात काम करणाऱ्या बैलासाठी २५ हजार रुपये, लहान कारवडी असल्यास १६ हजार रुपये मदत दिली जात आहे. या व्यतिरिक्त जिल्हा परिषदेलाही सानुग्रह अनुदान देण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

शासनाने सर्व पशुपालकांना आवाहन केले आहे की, लम्पी चर्मरोग आजार केवळ गाई व बैलांना होत असून त्याचा मानवी आरोग्याला कोणताही धोका संभवत नाही. या रोगाबाबत समाज माध्यमांमधून काही अफवा पसरविली जात असल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल. हा रोग माशा, डास, गोचिड इ. कीटकांमार्फत पसरत असल्याने या आजाराचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी ग्रामपंचायत व नगर परिषद अधिकाऱ्यांनी कीटनाशकांची फवारणी करावी आणि सर्व पशुपालकांमध्ये जनजागृती करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

लम्पी चर्मरोगावर उपयुक्त असणाऱ्या औषधींच्या उपलब्धतेसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत प्रत्येक जिल्ह्यासाठी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीमधून लम्पी चर्मरोगावरील नियंत्रणात्मक लसीकरणासाठी खाजगी पशुवैद्यकीय व्यावसायिक, सेवादाता (व्हॅक्सीनेटर्स) व पशुवैद्यकीय महाविद्यालयातील आंतरवासिता छात्र (इंटर्नीज) यांना पाच रुपये प्रती लसमात्राप्रमाणे मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

म्हशींची नियमित आरोग्य प्रमाणपत्रासह संक्रमित नसलेल्या क्षेत्रातून (घोषित एपी-सेंटर व्यतिरिक्तचे क्षेत्र) वाहतूक केली जाऊ शकते. आरोग्य प्रमाणपत्र जारी करण्यासाठी राज्य शासनाच्या, जिल्हा परिषदेकडील पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी (गट-अ) पेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करण्यात आले आहे. या आदेशानुसार म्हशींची वाहतूक करताना विहित प्रपत्रातील आरोग्य दाखला तसेच जनावरांची वाहतूक अधिनियम, २००१ मधील नियम ४७ अन्वये स्वास्थ्य प्रमाणपत्र अथवा पीसीआर चाचणीचा नकारार्थी अहवाल सोबत बाळगणे आवश्यक आहे.

प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंधक व नियंत्रण अधिनियम, २००९ मधील कलम ४(१) नुसार पशुमध्ये या रोगाची लक्षणे आढळून आल्यास प्रत्येक व्यक्ती, अशासकीय संस्था, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांनी सदरची माहिती नजिकच्या पशुवैद्यकीय संस्थेस कळविणे बंधनकारक आहे. गावस्तरावरून अशी माहिती संबंधित ग्रामसेवक आणि सरपंचांनी न चुकता जवळच्या पशुवैद्यकीय दवाखाना/ तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयास कळवावी. लम्पी चर्मरोगाची लक्षणे दिसल्यास, जवळच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखाने / पशुधन विकास अधिकाऱ्यांना माहिती देऊन मोफत उपचार करून घेण्याचे पशुपालकांना आवाहन करण्यात आले आहे. लम्पी चर्मरोग हा पशुधनातील जरी वेगाने पसरणारा संसर्गजन्य आजार असला तरी त्वरित उपचार सुरू केल्यास तो निश्चितपणे बरा होतो.

पशुपालकांनी भीती बाळगण्याचे कारण नसले, तरी त्यांनी आवश्यक खबरदारी घ्यावी. पशुधनाचे बहुतांश मृत्यू हे संबंधित आजारी पशुधनावर तीन ते चार दिवसांपेक्षा अधिक कालावधी लोटल्यानंतर उपचारास सुरुवात झाल्यामुळे झाले आहेत. लम्पी रोगाचा उपचार लक्षणे दिसल्यानंतर वेळेतच सुरू झाल्यास, मृत्यूची शक्यता अत्यंत कमी असून बहुतांश पशू उपचाराला चांगला प्रतिसाद देत आहेत. सर्व पशुपालकांनी लम्पी चर्मरोगाच्या संभाव्य लक्षणांकडे बारकाईने लक्ष ठेवावे व त्वरित नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा.

सर्व खासगी पशुवैद्यकीय व्यावसायिकांनी, सेवादात्यांनी तसेच पशुसंवर्धन विभागातील आणि महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठातील सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी स्वयंप्रेरणेने लसीकरण मोहिमेत सहभाग नोंदवावा. यासाठी त्यांनी संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयाशी संपर्क करावा. शासनाने खासगी पशुवैद्यकांना लम्पी चर्मरोगाचा उपचार करण्यासाठी कोणतीही बंदी घातलेली नाही. शासकीय आणि खाजगी पशुवैद्यकांनी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाने २४ सप्टेंबर २०२२ रोजी दिलेल्या सुधारित उपचार प्रोटोकॉल प्रमाणे उपचार करावेत. शासकीय अधिकाऱ्यांनी पशुपालकांकडे जाऊन औषधोपचार व लसीकरण करावे. शासनाकडून मोफत औषधोपचार व लसीकरणाचे नियोजन करण्यात आले आहे.

शासकीय अधिकाऱ्यांनी पशुपालकांकडे जाऊन औषधोपचार व लसीकरण करावे. शासनाकडून मोफत औषधोपचार व लसीकरणाचे नियोजन करण्यात आले आहे. तरी याबाबत तक्रार असल्यास संबंधितांवर सक्त कारवाई करण्यात येणार आहे. पशुपालकांनी अशी तक्रार विभागाच्या १८००-२३३०-४१८ टोल फ्री क्रमांकावर अथवा राज्यस्तरीय कॉल सेंटर मधील पशुसेवेच्या १९६२ टोल फ्री क्रमांकावर नोंदविण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त श्री. सिंह यांनी केले आहे.

ज्या जनावरांना लम्पी आजार झाला आहे, अशा जनावरांना बाजूला ठेवून त्यावर औषधोपचार तात्काळ सुरू केले पाहिजे. पशुसंवर्धन विभागाकडे मुबलक प्रमाणात औषधे व लसीची मात्रा उपलब्ध आहे. शेतकऱ्यांना, पशुपालकांना लम्पी आजार लसीकरण दृष्टीकोनातून काही कमी पडू दिले जाणार नाही. सध्या ज्या गावात लम्पी बाधित जनावरे आढळत आहेत त्या गावाच्या पाच किलोमीटर परिघापर्यंत असलेल्या गावात प्राधान्याने लसीकरण केले जात आहे. पाच किलोमीटर असलेली मर्यादा वाढविण्यासाठी प्रयत्न करुन इतर गावातही लसीकरण वाढविण्याचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.

मुंबई शहरातील जवळपास सर्व गोवर्गीय जनावरांचे लसीकरण पूर्ण झालेले आहे. या उपरही पशुपालकांची जनावरे लसीकरण करण्याची राहून गेली असल्यास त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेचा आपत्कालीन संपर्क क्रमांक १९१६, ०२२-२५५६३२८४, ०२२ - २५५६३२८५ व राज्य शासनाचा पशुवैद्यीय सेवा संपर्क क्रमांक १९६२ यावर संपर्क साधावा असेही आवाहन करण्यात आले आहे.

-राजू धोत्रे
विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क




## मोबाइल चार्ज करताना बाळगा सावधगिरी; पोलिसांकडून अलर्ट



मोबाइल फोन हा आपल्या जीवनाचा एक अतिशय महत्वाचा भाग बनला आहे. बहुतेक कामांमध्ये मोबाइलचा वापर सुरू झाला आहे. यामुळे काम खूप सोपे होते, मात्र यामुळे अनेकवेळा लोकांना नुकसानही सहन करावे लागते. या संदर्भात वेळोवेळी अलर्ट सुद्धा जारी केला जातो. एका ॲडव्हायझरीनुसार, जर तुम्ही सार्वजनिक ठिकाणी फोन चार्ज करत असाल तर तुम्हाला सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. अनेक वेळा आपण रेल्वे स्टेशन, विमानतळ किंवा इतर ठिकाणी उपलब्ध असलेल्या सॉकेटमध्ये चार्जर लावून फोन चार्ज करू लागतो, परंतु यामुळे तुमची वैयक्तिक माहिती चोरीला जाऊ शकते.

यासंदर्भात ओडिसा पोलिसांनी अलर्ट जारी केला आहे. यामध्ये सार्वजनिक ठिकाणी मोबाइल चार्जिंग स्टेशन, यूएसबी पॉवर स्टेशन आणि दुसऱ्या ठिकाणी मोबाइल चार्जिंग करू नका, असे म्हटले आहे. तसेच सायबर घोटाळेबाज तुमच्या फोनमध्ये मालवेअर इन्स्टॉल करून तुमची वैयक्तिक माहिती मोबाइलवरून चोरू शकतात, असेही ओडिसा पोलिसांनी ट्विट केले आहे.

दरम्यान, असा अलर्ट देण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही सार्वजनिक ठिकाणी मोबाइल चार्जिंगबाबत इशारा देण्यात आला आहे. अलीकडेच हैदराबादच्या सायबर पोलिसांनीही एक इशारा दिला आहे. ५जीसिम अपग्रेडच्या नावाखाली लोकांची फसवणूक केली जात असल्याचे सायबर सेलच्या वतीने सांगण्यात आले.

**अज्ञात लिंक्सपासून सावध राहण्याची गरज**

स्कॅमर्स मोबाइल युजर्सचे सिम ब्लॉक करतात आणि त्यांच्या खात्यातून पैसे काढतात. यासाठी स्कॅमर्सकडून मोबाइल यूजरला लिंक पाठवली जाते. युजर्स या लिंकवर क्लिक करतात, त्यांच्या बँक खात्याशी संबंधित अनेक माहिती स्कॅमर्सपर्यंत पोहचली जाते. त्यानंतर ते त्याचा वापर फसवणुकीसाठी करतात. यामुळे तुम्हाला अशा कोणत्याही अज्ञात लिंक्सपासून सावध राहण्याची गरज आहे.

## विश्वचषक जिंकवून देणारा गौतम गंभीर

निमित्त



गौतम गंभीर यांचा जन्म १४ ऑक्टोबर १९८१ रोजी झाला होता. त्याचे वडील दीपक गंभीर हे कापड व्यापारी असून आईचे नाव सीमा आहे. गौतमला एकता नावाची एक छोटी बहीण आहे, जी त्याच्यापेक्षा एक वर्षांनी लहान आहे. त्याच्या जन्माच्या केवळ १८ दिवसांनंतर, आजोबा आणि आजी त्यांना वाढवण्यासाठी त्यांच्याबरोबर घेऊन गेले आणि तेव्हापासून ते एकत्र आहेत. गंभीरने वयाच्या दहाव्या वर्षी क्रिकेट खेळायला सुरुवात केली. त्यांनी मॉडर्न स्कूल, नवी दिल्ली आणि नंतरचे शिक्षण हिंदू कॉलेजमध्ये पूर्ण केले. ते ९०च्या दशकात आपल्या काका पवन गुलाटी यांच्या घरी राहत होते आणि त्यांना आपला गुरू मानतात. कोणत्याही महत्त्वाच्या सामन्यापूर्वी अनेकदा ते त्याला कॉल करतात. त्यांना दिल्लीच्या लाल बहादूर शास्त्री अकॅडमीचे राजू टंडन आणि संजय भारद्वाज यांनी प्रशिक्षित केले. २००० साली त्यांची बेंगळुरू मध्ये राष्ट्रीय क्रिकेट अकादमीसाठी निवड झाली.

गौतम गंभीर हा डाव्या हाताचा सलामीवीर फलंदाज आहे जो दिल्लीकडूनही घरगुती क्रिकेट खेळतो आणि आयपीएल संघ कोलकाता नाइट रायडर्सचा कर्णधारही आहे. २००३ मध्ये त्याने बांगलादेशविरुद्ध एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि त्यानंतरच्याच वर्षी त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिला कसोटी सामना खेळला. २०१० ते २०११ दरम्यान त्याने इंटरनॅशनल सामन्यांमध्ये भारतीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघाचे नेतृत्वही केले आहे, त्याच्या नेतृत्वात भारताने ६ सामन्यांत ६ सामने जिंकले. २००७ वर्ल्डकपच्या दोन्ही फायनल्समध्ये भारताने जिंकलेला २००७ वर्ल्ड टी २० (५४ चेंडूत ७५ धावा) आणि २०११ क्रिकेट विश्वचषक (११२ चेंडूत ९७ धावा) महत्त्वपूर्ण खेळी खेळल्या.

२००८ मध्ये त्यांना भारताचा दुसरा सर्वोच्च क्रिडा पुरस्कार अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २००९ मध्ये आय.सी.सी. कसोटी क्रमवारीत तो जगातील नंबर एकचा फलंदाज ठरला. त्याच वर्षी त्याला आय. सी.सी. टेस्ट प्लेअर ऑफ द इयर पुरस्कारही देण्यात आला.

इंडियन प्रीमियर लीगच्या पहिल्या खेळाडूंच्या लिलावात एक वर्षासाठी दिल्ली डेअरडेव्हिल्स फ्रँचायझीने गंभीरची निवड केली होती, ज्याची किंमत ७२५,००० अमेरिकन डॉलर्स आहे. त्याने पहिल्या सामन्यात १४ सामन्यांत ५३४ धावा करून दुसऱ्या सर्वाधिक धावा केल्या. २०१० च्या आयपीएल हंगामात त्याला दिल्ली डेअरडेव्हिल्सचा कर्णधार म्हणून बढती देण्यात आली. स्पर्धेच्या शेवटी दिल्ली डेअरडेव्हिल्सचा तो एकमेव खेळाडू होता जो आयपीएलमध्ये १०००हून अधिक धावा करू शकला.

२०११ च्या आयपीएलच्या लिलावात गंभीरला सर्वाधिक पसंती देण्यात आली होती. त्याने कोलकाता नाईट रायडर्सकडून २.४ दशलक्ष डॉलर्सची बोली लावली आणि आयपीएलच्या इतिहासातील सर्वाधिक मानधन घेणारा क्रिकेटपटू ठरला. त्यानंतर त्याला संघाचा कर्णधार म्हणून नेमण्यात आले. गंभीरच्या नेतृत्वात कोलकाता नाईट रायडर्सने आयपीएलच्या प्लेऑफसाठी पात्रता मिळविली आणि चॅम्पियन्स लीग ट्वेंटी-२०मध्ये प्रथमच प्रवेश केला. अखेरीस त्याने चेन्नईच्या घरच्या मैदानावर चेन्नई सुपर किंग्जचा ५ गडी राखून पराभव करून चॅम्पियन्स सहा पहिले जेतेपद मिळवून दिले. गंभीर कोलकाता नाईट रायडर्सचा अग्रगण्य धावा करणारा खेळाडू आहे. त्याच मोसमात त्याने आपल्या संघाकडून एकूण नऊपैकी सहा अर्धशतके झळकावली आणि २००० धावांचा टप्पा पार करून स्पर्धेतील दुसऱ्या क्रमांकाची नोंद करणारा आयपीएल इतिहासातील दुसरा खेळाडू ठरला.

क्लिक...क्लिक...! (छाया : सुधीर नाझरे)



मुरुड : सध्या सुरू असलेल्या परतीच्या पावसामुळे पर्यटक येत नसल्याने किनारा परिसरात शुकशुकाट पसरला आहे.

आरोग्य प्रहर

## दृष्टी वाढविण्यासाठी 'या' पदार्थांचे सेवन फायदेशीर!

शरीरातील प्रत्येक अवयव हा महत्त्वाचा मानला जातो. कारण प्रत्येक अवयवामुळे आपण परिपूर्ण आहोत. डोळ्यांची काळजी घेणे फार गरजेचे आहे. आज आम्ही तुम्हाला डोळ्यांची दृष्टी कशी वाढवायची याबाबत काही घरगुती उपाय सांगणार आहोत. यामुळे तुमच्या डोळ्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल.

**मासे** - डॉक्टरांच्या मते, डोळ्यांची दृष्टी तीक्ष्ण करण्यासाठी तेलकट माशांचे सेवन फायदेशीर ठरते. ते खाल्ल्याने ओमेगा ३ मिळते. ट्यूना, सॅल्मन, ट्राउट, सार्डिन आणि लहान समुद्राचे मासे हे त्याचे सर्वोत्तम स्त्रोत आहेत. त्यामुळे तुमच्या आहारात मासे असणे फार महत्त्वाचे आहे.



**ड्रायफ्रूट्स** - काजू, बदाम आणि अक्रोड यांसारख्या ड्रायफ्रूट्स मध्येही ओमेगा-३ फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात असते. तसेच नट्समध्ये व्हिटॅमिन ई देखील जास्त असते. जे डोळ्यांना नुकसान होण्यापासून वाचवते. तसेच बदामाच्या सेवनाने डोळ्यांची नजरदेखील वाढते. युनाइटेड स्टेट डिपार्टमेंट ऑफ ॲग्रीकल्चरच्या रिसर्चनुसार बदामामध्ये व्हिटॅमिन 'ए' मोठ्या प्रमाणात आढळते. तुम्ही दररोज दुधात बदामाची पुड टाकून त्याचे सेवन करू शकता.

**शेंगदाणे** - शेंगदाणे किंवा शेंगदाण्यांप्रमाणे काही बिया असतात त्यामध्ये ओमेगा-३ चा समावेश असतो. हे व्हिटॅमिन ईचे समृद्ध स्त्रोत देखील आहेत. अशा परिस्थितीत कमकुवत दृष्टी असलेल्या लोकांनी शेंगदाणे, बियाणे, फ्लेक्स बियाणे खावेत. याचा चांगला फायदा होतो.

**लिंबू-संत्री फळे** - लिंबूवर्गीय फळांचे सेवन डोळ्यांची दृष्टी वाढवण्यासाठी देखील फायदेशीर आहे. त्यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. याशिवाय त्यात व्हिटॅमिन ई आणि विशेष अँटिऑक्सिडंट्स असतात. त्यामुळे डोळ्यांचा कोरडेपणा दूर होण्यासाठी मदत होते. त्यामुळे तुमच्या मेनूमध्ये लिंबू आणि संत्री या फळांचा समावेश करा.

**हिरव्या पालेभाज्या** - हिरव्या पालेभाज्यांमध्ये ल्युटीन आणि झेक्सॅन्थिनसारख्या पोषक तत्वांचा समावेश असतो. त्यामध्ये व्हिटॅमिन सी देखील आढळते. त्यामुळे पालक, कोबी, बथुआ इत्यादी भाज्यांचे सेवन केल्याने डोळ्यांची दृष्टी वाढते.

**गाजर** - डोळ्यांना निरोगी ठेवण्यासाठी व्हिटॅमिन ए आणि बीटा कॅरोटीन खूप महत्वाचे आहेत. गाजरात बीटा कॅरोटीन मुबलक प्रमाणात असते. यामध्ये रोडोपसिन नावाचे प्रोटीनदेखील असते जे रेटिनाला प्रकाश शोषण्यास मदत करते.

# परतीच्या पावसाचा पर्यटनालाही फटका

## मुरूडकडे पर्यटकांनी फिरविली पाठ



**मुरूड : प्रतिनिधी**

सतत पडत असलेल्या परतीच्या पावसामुळे मुरूडमधील पर्यटन थंडावले असून, बाजारात मंदीचे सावट आहे.

मुरुड तालुका हा पर्यटन तालुका आहे. या ठिकाणी वर्षाला सहा लाखापेक्षा जास्त पर्यटक येत असतात. पावसाचे प्रमाण कमी होतच सप्टेंबर महिन्यात मुरूडमध्ये पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात. मात्र यंदा सप्टेंबर महिना संपून ऑक्टोंबर महिन्याची १३ तारीख उजाडली तरी पाऊस हटण्यास तयार नाही. रोज पावसाचे काळे ढग दाटून येतात पावसाची सुरुवात होते. सततच्या या पावसाचा मुरूडच्या पर्यटनावर मोठा परिणाम झाला आहे. पर्यटकांनी मुरूडकडे पाठ फिरविली आहे. दरम्यान, सप्टेंबर, ऑक्टोंबरचा मोठा सिझन पर्यटकांविना गेल्याने हॉटेल व लॉजिंग व्यवसायिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या काळात समुद्रावर येणाऱ्या पर्यटकांना विविध सेवा देणाऱ्या चहा टपऱ्या, शहाळी विक्रेते, अल्पोहार गृह, थंड पेय विक्रेते, घरगुती खानावळ, घोडेस्वार, उंट सफारी, वाळूवर चालणाऱ्या गाड्या आदी व्यवसाय ठप्प झाले आहेत. दोन महिन्यात कोणताच धंदा न झाल्याने येथील दुकानदार, हॉटेल व लॉजिंग व्यवसायिक आर्थिक समस्येत सापडले आहेत. प्रसिद्ध जंजिरा किल्ल्यावरसुद्धा पर्यटक येत नाहीत.त्यामुळे बोट मालकसुद्धा चिंतेत आहेत. पर्यटक नसल्याने संपूर्ण बाजरपेठेवर मंदीचे सावट निर्माण झाले आहे.

## जिल्ह्यात वरुणराजाचा जोर कायम

**अलिबाग : प्रतिनिधी**

पावसाच्या परतीचा प्रवास लांबला आहे, त्यामुळे बळीराजा मात्र धास्तावला आहे. मागील आठ दिवस पावसाचे वाजत-गाजत होणारे आगमन मनात भीतीचे काहूर माजवित आहे. गुरुवारी (दि. १३) दुपारी अचानक अलिबागसह जिल्ह्यातील अनेक भागात पावसाने घुमशान केले. तासभर झालेल्या या पावसामुळे सर्वांची तारांबळ उडाली.

यंदाचा पाऊस जरी थोडा उशिराने सुरू झाला असला तरी शेतीपूरक पाऊस म्हणून त्याचे समाधान होते. मात्र त्याचा परतीचा प्रवास लांबल्यामुळे बळीराजाला आता त्याच्या जाण्याची प्रतीक्षा आहे, तो अजून काही दिवस असाच बरसला तर तयार झालेली भातशेती पाण्यात जाईल आणि शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान होण्याची भीती आहे.

नवरात्र उत्सवात पावसाचे हस्त नक्षत्र २७ सप्टेंबरला सुरू झाले. या नक्षत्रात



संध्याकाळी पाऊस वाजत गाजत, वाऱ्याच्या वेगाने येतो, तास दोन तास पडतो पण या तासात भाताचे उभे पीक आडवे करून जातो. यंदा नवरात्र उत्सवात पावसाची हजेरी लागेल, अशी भीती होती. मात्र प्रत्यक्षात नऊ दिवस कोरडे गेले. दसरा आनंदात साजरा झाला. रात्री पडणाऱ्या दवबिंदूमुळे पावसाच्या परतीचा प्रवास सुरु झाल्याचे वाटत असताना ६ ऑक्टोबरपासून पुन्हा गडगडाट-कडकडाट करीत त्याचे पुनरागमन झाले. त्या दिवसापासून महाराष्ट्रात ठिकठिकाणी पावसाने दमदार हजेरी लावत सर्वांची तारांबळ उडवून दिली.

अलिबाग परिसरात गुरुवारी सकाळी हवामान स्वच्छ होते. दुपारी अचानक गडगडाट सुरू झाला. काळ्या ढगांनी अंधार केला आणि मोठमोठ्या थेंबाच्या सरी कोसळू लागल्या. पावसाच्या सुरुवातीला आणि मधल्या काळातदेखील इतक्या जोराचा पाऊस अलिबागकरांनी अनुभवला नव्हता. तो गुरुवारी दुपारी शहरात आणि परिसरात झाला. विशेष म्हणजे अलिबागसह तालुक्यात आणि जिल्ह्यातील रोहा, उरण, पेण यासह अनेक भागात दुपारी जोरदार पाऊसधारा बरसल्या.तासाभराच्या या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. अनेकांची तारांबळ उडाली. विजांचा कडकडाट आणि गडगडाट झाल्याने काही काळ वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यानंतर सायंकाळपर्यंत पावसाची रिपरिप सुरू होती.

## खरवली ग्रामपंचायत निवडणूक प्रचारात पडली वादाची ठिणगी

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील काळीज खरवली ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. या प्रचारादरम्यान शिंदे गट आणि महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक वादाची ठणगी पडली आहे.महाड तालुक्यातील काळीज खरवली ग्रामपंचयतीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून १६ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. याठिकाणी कायम शिवसेनेचे वर्चस्व राहिले आहे. काळीज खरवली गावाच्या शेजारीच आमदार भरत गोगावले राहत असल्याने ही निवडणूक प्रतिष्ठेची झाली आहे. या ठिकाणी उद्धव ठाकरे आणि भरत गोगावले असलेल्या शिंदे गटाचेदेखील समर्थक आहेत. गुरुवारी प्रचार फेरी सुरू असताना या दोन गटातील कार्यकर्त्यांत बाचाबाची झाली. यामुळे प्रचारात वादाची ठिणगी पडली. पोलिसांनी हस्तक्षेप करून प्रचार फेऱ्या सुरळीत आणि शांततेत करण्याच्या सूचना दिल्या.

## खोपोली नगर परिषदेच्या निवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देणी अदा

**मुख्याधिकाऱ्यांच्या पाठपुराव्याला यश**

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषदेतील निवृत्त कर्मचाऱ्यांचे सातवे वेतन आयोगाप्रमाणे उपदान (ग्रॅच्युइटी) व रजावेतन फरकाचा अंदाजे अडीच कोटीचा धनादेश मंगळवारी (दि. ११) मुख्याधिकारी, प्रशासक अनुप दूरे यांच्या सहकाऱ्यांमुळे निवृत्त कर्मचऱ्यांचा देण्यात आला.



अनेक थकीत असलेली देणी दिवाळीच्या तोंडावर मिळाल्याने निवृत्त कर्मचाऱ्यांनी मुख्याधिकारी दुरे यांचे अभार मानले. सातवे वेतन आयोगाप्रमाणे उपदान (ग्रॅच्युइटी) व रजावेतन फरकाची रक्कम मिळावी, यासाठी खोपोली नगर परिषदेचे २०१६,२०१७ आणि २०१८ यावर्षात निवृत्त झालेले एकूण ६२ कर्मचारी नगर परिषदेच्या पायऱ्या झिजवत होते, वेळप्रसंगी त्यांनी उपोषणही केली. प्रशासक, मुख्याधिकारी अनुप दूरे यांनी सकारात्मक भूमिका घेत निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केल्यामुळे दोन कोटी ४० लाख २७ हजार रुपयांचा धनादेश दिला आहे. या वेळी लेखाधिकरी सोनीनाथ तुपे, मयुरी पाटील, निवृत्त कर्मचारी प्रतिनिधी विष्णू पाटील, डी. पी. पाटील, अस्लम कर्जेकर, सुखदेव मंडलिक, सामाजिक कार्यकर्ते संदीप पाटील उपस्थित होते.

**उर्वरीत काही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची देणी तांत्रिक अडचणी असल्यामुळे दिली नाहीत, पण लवकरात लवकर त्यांनाही देणी दिली जातील.**
**-अनुप दुरे, मुख्याधिकारी, खोपोली नगर परिषद**

## लोकलमध्ये सापडलेले पाकीट संबंधिताला केले परत

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली-सीएसटी लोकलमध्ये बुधवारी (दि. १२) सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास शासकीय कागदपत्रे असलेले एक पाकीट रा.स्व. संघ जनकल्याण समितीचे कोकण विभागाचे ग्राम आरोग्य रक्षक प्रमुख रत्नाकर थत्ते यांना सापडले. त्यानंतर त्यांनी संबंधित व्यक्तीच्या पत्त्यावरून शोध घेऊन त्यांना ते पाकीट परत केले आहे.

रत्नाकर थत्ते हे वैयक्तिक काम संपवून खोपोलीहून सीएसटी लोकलने बदलापूरला जात असताना त्यांना एक पाकिट मिळाले.

या पाकिटामध्ये क्रेडिट कार्ड, मतदानाचे कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन, आधार कार्ड, डेबिट कार्ड, इत्यादी महत्त्वाची कागदपत्रे होती. मात्र त्यामध्ये संपर्काचा कोणताही नंबर उपलब्ध नव्हता. आधार कार्डवरून ती व्यक्ती वेरळ (ता. खेड, जि. रत्नागिरी) येथील असल्याचे समजले. त्यावरून थत्ते यांनी जनकल्याण समितीचे उत्तर रत्नागिरी विभाग कार्यवाह दीपक यादव आणि जनकल्याण समितीचे धामणंद गावातील अंशकालीन कार्यकर्ते दत्ता म्हापदी यांना त्वरित संपर्क करून त्या व्यक्तीचा संपर्क नंबर मिळवायला सांगितले.

त्या गावामध्ये दीपक यादव यांचे स्नेही असल्यामुळे त्या ठिकाणी त्यांनी त्वरित संपर्क केला. दीपक यादव यांच्या स्नेह्याकडून त्या व्यक्तीचा संपर्क नंबर मिळविला.

त्यानंतर रत्नाकर थत्ते यांनी संबंधित व्यक्तीला संपर्क केला व त्याचीही सर्व कार्ड बदलापूरला सुरक्षित असल्याचे सांगितले.

पाकीट मिळाल्यापासून २४ तासाच्या आत रत्नाकर थत्ते, दीपक यादव, दत्ता म्हापदी या सर्व व्यक्तींनी जे काम केले आहे.

ते कौतुकास्पद आणि अभिनंदन करण्यायोग्य आहे. संघाची संपर्क यंत्रणा कशी प्रभावीपणे काम करू शकते, याचे दर्शन यातून घडले आहे.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM RE-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:** EE/EHV (O &M )/ DIVN/ MHD/Tech/ Tender No. 40/2022-23 Dtd.14.10.2022 **RFx No.7000024813** | **Sub:** Invitation of SRM E-Tender for anticorrosive coating painting with chemical resistance of 25 MVA TF-2, 100 MVA ICT-2 at 220/100/22 kV Kandalgaon S/s, 25 MVA T/F-I & 25 MVA T/F-II & Gantry column/Beam structure at 100/22 kV Mhasala S/s and 25 MVA TF-1, at 220/22 kV Vilebhagad S/s under EHV O&M Division, Mahad. | **Up to Rs. 24,95,301/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be 1% of the estimated cost or Rs. 5,000/- whichever is the highest & tender fee will be Rs. 500/- plus GST+1% Labour CESS.
Bid submission is from 14.10.2022 @ 00:00 hrs to 20.10.2022 @23:59 Hrs for above tender.
For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV(O&M) Dn, Mahad**


## साजगावची यात्रा कुणाच्या अधिपत्याखालील?

### देवस्थान समिती व खोपोली पालिकेचे उत्पन्नाकडे लक्ष, गाळेधारक मात्र संभ्रमात

**खालापूर : अरुण नलावडे**

चार दशकांची परंपरा असणाऱ्या साजगाव यात्रेवर खोपोली नगर परिषद व विठ्ठल मंदिर देवस्थान समितीने हक्क सांगितल्याने यात्रा कोणाची असा सवाल उपस्थित केला जात आहे. खोपोली नगर परिषद हद्दीत दरवर्षी भरणाऱ्या या यात्रेत परवानगी, ना हरकत दाखला कोणाकडून घ्यावा, असा संभ्रम या यात्रेत येणाऱ्या जुन्या गाळेधारकात निर्माण झाला आहे.

साजगावची यात्रा सुकी मच्छी, मिठाई विशेषतः जिलेबी, शेव, खेळणी तसेच बैल व घोंगडी बाजारासाठी महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. या जत्रेत व्यापारांच्या चार पिढ्या व्यवसाय करीत आहेत. खोपोली नगर परिषदेने ठरवून दिलेल्या एकाच जागेवर १५ दिवस व्यापार करुन पुढील वर्षी त्याच जागेवर हे व्यापारी दुकान मांडत असतात.

साजगांव यात्रेत ८९६ पारंपारिक गाळेधारक असून खोपोली नगर परिषद दिवाबत्ती, आरोग्य, पाणीपुरवठा व नियोजन अशा सुविधा पुरविण्याच्या बदल्यात दरवर्षी ८ ते १० लाखांचा उत्पन्न तिजोरीत जमा करीत असते. मात्र या वर्षी विठ्ठल मंदिर देवस्थान समितीने या यात्रेवर हक्क सांगितला असून, गाळेधारकांकडून आम्हीच करही वसूल करु असा पवित्रा घेतला आहे. हे उत्पन्न मंदिर देखभाल, दिवाबत्ती, धार्मिक कार्यक्रम व नव्या वास्तुच्या उभारणीसाठी वापरणार असल्याचे देवस्थान समितीचे उपाध्यक्ष जयवंत पाटील यांनी सांगितले. त्यामुळे साजगाव यात्रा खोपोली नगर परिषदेची की देवस्थान समितीची असा संभ्रम निर्माण झाला आहे.

खोपोली नगर परिषद स्थापन होण्यापूर्वी (१९७२) ताकई हे गाव साजगाव ग्रामपंचायतीमध्ये होते. त्यामुळे ही यात्रा साजगाव यात्रा म्हणून प्रसिध्द आहे. मात्र मंदिर ताकई गावात असल्याने या यात्रेला ताकई यात्रा असे नाव असावे, अशी मागणी ताकई ग्रामस्थ करीत आहेत. येथील विकासकामांसाठी रायगड जिल्हा परिषद व खालापूर पंचायत समिती निधी देत असते. मात्र खोपोली नगर परिषद हद्दीत ही यात्रा भरत असून, तेथील महसूल नगर परिषद वसूल करीत आहे. दरम्यान, खोपोली नगर परिषद, ग्रामस्थ मंडळ-ताकई, देवस्थान समिती साजगाव-ताकई, व वारकरी संप्रदाय-धाकटी पंढरी अशा संस्था या यात्रेवर हक्क सांगत असल्याने तिढा निर्माण झाला आहे. यात्रा भरते ती जागाच वन विभागाची आहे. १५ दिवसांच्या यात्रेसाठी १० एकर माळरान राखीव असा शिक्का जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर आहे.

कार्तिक शुद्ध एकादशीच्या आदल्या रात्री ताकई गावातून विठ्ठलाची पालखी काढण्यात येते. ताकई गावातील तीन घराण्यांना पालखीचा मान दिला जातो. गावात कीर्तन, भजन अशा धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होते. मध्यरात्री पालखी साजगाव मंदिरात पोचते. कार्तिक शुद्ध एकादशीच्या पहाटे मूर्तीचा अभिषेक व महापुजेनंतर यात्रा व पांडुरंगाच्या दर्शनाला सुरुवात होते. येत्या ४ ते २० नोव्हेंबर २०२२ या काळात साजगाव यात्रा भरणार यात्रा भरणार आहे.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे-नानोशी, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत १) श्री. बळीराम हिरा पाटील, २) श्री. कृष्णा हिरा पाटील, ३) हनुमान हिरा पाटील, ४) सौ. रूपाली योगेश पवार, ५) श्री.राहुल वामन पाटील, ६) चांगुणाबाई हिरा पाटील यांचेकडून खरेदीखताने कायमस्वरुपी खरेदी करण्याचे योजिले आहे.

**भूखंडाचे वर्णन**
**मौजे- नानोशी, ता, पनवेल, जि. रायगड**

| गट क्र. | गट क्रमांकाचा उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| ९४ | २ | ०-३८-७० पो.ख. ०-०६-८० | ८.३७ |

वर नमूद मिळकतीस अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न, वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरुपासहीत प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्त्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर १५ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचे खरेदीखत व अनुशंगिक दस्त कायदेशीरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

**दिनांक - १३/१०/२०२२**
**ठिकाण - पनवेल**

**सही/-**
**ॲड. शरद जाधव**
**संपर्कासाठी पत्ता- तळमजला, रॉयल प्राईड बिल्डींग, भूखंड क्र. ११३, मिडल क्लास को. ऑप. हौ. सोसायटी, पनवेल-४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड**
**मो. ९८२०६३७१७५**



वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर



**नमुना एन. डी.**
(नियम ९२(३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH46/CC/Auto/2018/2494 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 AZ 1462 चे मालक **सोमनाथ लहु कडू** यांचे दि. २६/०५/२०१८ रोजी निधन झालेले आहे.

मी रेखा सोमनाथ कडू, पत्ता :- घ. क्र. ५८४, से १३ हनुमान मंदिर रोड खारघर, ता. पनवेल उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - रेखा सोमनाथ कडू**
**पत्ता :- घर नंबर.५८४, हनुमान मंदिर रोड से १३ मराठी शाळेजवळ खारघर, रायगड, महाराष्ट्र- ४१०२१०**
**मो. ७५०६४९१२४२**



**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | मे. मे.फ्युचर आयकॉन बिल्डर्स एल.एल.पी, प्लॉट नं ३३, सेक्टर-१७, नवीन पनवेल (प), ता.पनवेल, जि. रायगड. | ०१ उंबर, ०१ बदाम, ०१ गुलमोहर, ०१ रेन ट्री, ०२ जंगली अशी एकूण ०६ झाडे तोडणी करणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं-३३, सेक्टर-१७, नवीन पनवेल (प) येथील प्लॉटच्या बाहेर फूटपाथवर ०६ झाडे असुन प्लॉटमध्ये ये-जा, करण्यास अडथळा निर्माण करीत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**जा.क्र. पमपा/उद्यान/२१२२/प्र.क्र. ८१ /५९४ /२०२२**
**दिनांक :-१३ /१०/२०२२**

**सही/-**
**(उपायुक्त)**
**पनवेल महानगरपालिका**



**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**
नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :- kbmc123@gmail.com वेबसाईट :- http://kbmc.gov.in

जा.क्र. : कुबनप/साबां/४१९/२०२२-२३ दिनांक :- १३/१०/२०२२

**जाहीर निविदा सूचना क्र. ८४/२०२२-२३**

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या निधीतून कुळगाव बदलापूर क्षेत्रातील मौजे वालिवली येथील आरक्षण क्र.५१ मध्ये आदरणीय कै.बाळासाहेब ठाकरे स्मारक बांधणे.(टप्पा-२),अंदाजित रककम ३,२४,६१,४८९/या कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.१३/१०/२०२२ ते ०७/११/२०२२ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत आहे व सदर निविदा दि.०९/११/२०२२ रोजी दु..३.०० नंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**(योगेश गोडसे)**
मुख्याधिकारी तथा प्रशासक
कुळगांव बदलापूर नगरपरिषद



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल **श्री. गोपिनाथ दिनकर भगत,** रा. नौपाडा, पो. कामोठे. ता. पनवेल. जि. रायगड यांच्या मालकीच्या परिशिष्टात वर्णन केलेल्या सदनिकेबाबत आमचे अशिल व चौहान ग्रुप तर्फे भागीदार श्री. राजेंद्र एन. पटेल यांच्यात करण्यात आलेल्या दि. १२/११/२०११ रोजीच्या नोंदणीकृत ॲग्रीमेंट फॉर सेल (पवल-२, दस्त नं. १०८६०/२०११) या दस्ताची मुळ प्रत आमच्या अशिलांकडून गहाळ झाली आहे. त्याबाबत त्यांनी कामोठे पोलीस स्टेशन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथ प्रॉपर्टी मिसिंग रजिस्ट्रेशन नं. १४५४/२०२२ दि. १२/१०/२०२२ प्रमाणे तक्रार नोंदविलेली आहे.

तरी वर नमूद गहाळ झालेल्या दस्ताची मुळ प्रत कोणालाही सापडल्यास सदरची प्रत आमचे अशिल अगर आमच्या खालील कार्यालयाच्या पत्त्यावर त्वरीत आणून दयावी अथवा त्याबाबत कळवावे.

**परिशिष्ट**

**दुकान नं. ०२, तळ मजला, साई विला बिल्डींग, सेक्टर नं. २२, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड, क्षेत्र १८.४९ चौ.मी. (कारपेट)**

**पनवेल.**
**दि. १३/१०/२०२२.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
दूरध्वनी क्र. : ९९३०३६९८६१

# उद्योगमंत्र्यांकडून उद्योजकांना दिवाळी भेट

## ना. उदय सामंतांनी घेतला समस्यांचा आढावा



**नवी मुंबई : बातमीदार**

येत्या दोन वर्षात पायाभूत सुविधा तसेच पाण्याची समस्या सोडवण्याचे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत उदयोजकांना दिले. बुधवारी (दि. १२) ते लघु उद्योजक संघटना, एमआयडीसीकडून महापे येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत सहभागी झाले होते. नवी मुंबईतील महापे औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांच्या विविध समस्यांचा आढावा घेऊन संबंधित यंत्रणांना त्या दूर करण्याच्या सूचना उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिल्या.

या वेळी नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर, नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी बिपिन शर्मा, वीज महामंडळाचे प्रादेशिक संचालक चंद्रकांत डागे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी नवी मुंबईतील उद्योजकांसमवेत विविध विभागातील अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत लघु उद्योजकांच्या समस्या त्यांच्या अडचणी जाणून घेऊन तात्काळ संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना या समस्या सोडविण्यासाठीचे निर्देश देण्यात आले. आठवड्यातील दोन दिवस राज्यातील मोठ्या औद्योगिक वसाहतींना भेट देऊन समस्या जाणून घेणार व त्यावर उपाययोजना करणार असल्याचे मंत्री सामंत म्हणाले.

एमआयडीसीमधील सर्व रस्ते दोन वर्षांमध्ये पूर्ण होतील. पाण्याच्या योजना एका वर्षामध्ये पूर्ण होतील. मलनिःसारण वहिनीसारखे विषय मार्गी लावले जातील, असे आश्वासन उद्योजकांना देण्यात आले. तसेच आयटी पॉलिसी फायनल केली आहे. आयटीमधील इंडस्ट्रियल सेक्टरला जास्तीत जास्त लाभ देण्याची भूमिका सरकारची आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना प्रेझेंटेशन सादर केल्यानंतर एक चांगली आयटी पॉलिसी पुढे येईल आणि त्यातून आयटी उद्योग उभारी घेईल, असा विश्वास मंत्री सामंत यांनी व्यक्त केला.

औद्योगिक क्षेत्रात चोरीचे प्रमाण वाढल्याने नवी मुंबई महापालिकेने सीसीटीव्ही लावावे तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्तांनी पोलीस गस्ती वाढविण्याच्या सुचना उद्योग मंत्री सामंत यांनी दिल्या. औद्योगिक क्षेत्रात पाण्याची कमतरता दूर करण्यासाठी जलसंपदा विभागाशी चर्चा करून योग्य तो मार्ग काढून समस्या दूर करण्यात येईल, असे या वेळी मंत्री सामंत यांनी सांगितले. या वेळी मंत्री सामंत यांनी उद्योजकांच्या समस्या ऐकून सर्वांच्या समस्या निरसन करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

### संबंधित विभागांना सूचना

***कामे वेळेवर पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून चालणार नाही तर पोलीसांच्या मदतीने कारवाई करावे. रस्ते तयार करताना विद्युत विभागाच्या वायर तुटतात. त्या वेळेवर दुरुस्त होत नाही. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात विद्युत खंडित होते. यापुढे नवीन कामे सुरू करताना सर्व विभागाची परवानगी घेऊन सुरु करावीत अश्या सूचना मंत्री उदय सामंत यांनी संबंधित विभागांना या वेळी दिल्या.***

## अल्पवयीन मुलगी गर्भवती; नराधमाचा पोलिसांकडून शोध

**पनवेल : वार्ताहर**

अल्पवयीन मुलीला चार महिन्यांची गरोदर ठेवल्याप्रकरणी एका नराधमाच्या शोधात पोलीस आहेत.



पीडित मुलगी १५ वर्षांची असून ती चार महिन्यांची गरोदर झाल्यानंतर तीच्या आईला याबाबत समजले. नेरूळमध्ये राहणारी व मुलांच्या पालन पोषणासाठी घरकाम करणाऱ्या आईने याबाबतची तक्रार नेरूळ पोलिसांना दिल्यावर या घटनेची नोंद केली. पोलिसांनी या घटनेची शोध घेतल्यानंतर पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फणसवाडी (वलप) गावात राहणाऱ्या या नराधमाने बालिकेचे दोन वर्षे शोषण केल्याचे पोलिसांना समजले. त्यांनतर तत्काळ हा गुन्हा पनवेल तालुका पोलिसांकडे तपासासाठी वर्ग करण्यात आला. ह्या गंभीर प्रकरणाची नोंद घेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांनी या प्रकरणी पोलीस निरिक्षक अंकुश खेडकर व सहाय्यक पोलीस निरिक्षक अंबिका अंधारे यांचे पथक नेमून याबाबत तपास करण्याची सूचना दिली.

पनवेल तालुक्यातील वलप गावातील फणसवाडी या गावातील एका तरुणाच्या संपर्कात गेल्या दोन वर्षांपासून संबंधित पिडीताचे शोषण केले जात असल्याचे तिच्या आईला समजल्यावर या घटनेला वाचा फुटली. पनवेल तालुका पोलीस या प्रकरणातील संशयीत आरोपीचा शोध घेत आहेत.



**पनवेल : शहरात नव्याने अल-हातीम टुअर अ‍ॅण्ड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय हाजी शकील सय्यद, अब्दुल बाकी मुकिद काझी आणि हाजी अरफत सय्यद यांनी सुरू केला आहे. या व्यवसायाच्या कार्यालयाचे उद्घाटन बुधवारी झाले असून या कार्यालयास महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक मुकिद काजी, मुश्ताक नाखवा, हाजी शकील सय्यद, अब्दुल बाकी काझी, हाजी अरफत सय्यद, जवाद काझी आदी उपस्थित होते.**

## गव्हाण विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडलेंचे मान्यवरांकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थे गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये नुकतेच उपमुख्याध्यापक पदी बढतीने रूजू झालेले प्रमोद मंडले यांचे संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन आणि रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी व समन्वय समितीचे सदस्य अरुणशेठ भगत यांनी हार्दिक अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

या वेळी रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी, विज्ञान अध्यापिका चारुशीला ठाकूर, विद्यालयाचे लेखनिक चंद्रकांत मढवी आणि ग्रंथपाल महेश म्हात्रे आदी उपस्थित होते.





## कुंडेवहाळमधील २०० ज्येष्ठ नागरिक, निराधार महिलांना मोफत काशीयात्रा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदू धर्मात काशी तीर्थयात्रेला विशेष महत्त्व आहे. आल्या जन्मी एकदा तरी काशी येथे जायची प्रत्येक धार्मिक व्यक्तीची इच्छा असते. पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ ग्रामस्थांची ही इच्छा पूर्ण झाली आहे. तेथील २०० ज्येष्ठ नागरिक आणि निराधार महिलांना मोफत काशीयात्रा घडली आहे.

कुंडेवहाळमधील २०० लोक रेल्वेगाडीने काशी येथे गेले होते. त्यामध्ये वयोवृद्धांचाही समावेश होता. त्यामुळे डॉक्टर सोबत होते, तर एक महिला ९६ वर्षांची असल्याने वैयक्तिक खर्चाने तिला नातेवाइकांसोबत विमानाने पाठविण्यात आले. काशी येथे सर्वांची राहण्या-खाण्याची व्यवस्था मोफत करण्यात आली होती. या यात्रेकरूंनी काशी विश्वेश्वराचे मनोभावे दर्शन घेतले. बोटीतून ८४ घाटांचे भ्रमण करून गंगा आरती केली, तसेच जवळपास सर्वांनी पितरांचे पिंडदान केले. या वेळी त्यांना आत्मिक समाधान लाभले.

आपल्या सरपंचपदाचे मानधन आणि स्वखर्चातून सरपंच सदाशिव रामदास वास्कर यांनी आणि श्री काशी विश्वनाथ मित्र मंडळाने ही जनसेवा केली. त्यांना सुनिता रेवनाथ पाटील, विक्रम महाराज थोरवे, अमित राम वास्कर, डॉ. मनीषा जीवन गांगरे, रमण वास्कर, तुकाराम वास्कर, अरविंद वास्कर, प्रशांत पाटील, तुषार पाटील, प्रवीण पाटील, भानूदास वास्कर, ज्ञानेश्वर भोईर, प्रकाश महाराज पाटील, दयानंद म्हात्रे, सुभाष परशुराम पाटील, समाधान वास्कर, संदीप किसन वास्कर, अनंत वास्कर, सुदाम वास्कर, दत्तात्रय पाटील, विनोद भोईर, ऋषिकेश वास्कर, कपिल पाटील, केवल भोईर, मिलिंद वास्कर, संकेत म्हात्रे, विजय शेठ ठाकूर, सुभाष म्हात्रे, आकाश भोईर यांचे सहकार्य लाभले. कृतार्थ भावनेने सारे जण घरी सुखरूप परतले. या वेळी कुंडेवहाळ ग्रामस्थांनी सर्व काशी यात्रेकरूंचे जोरदार स्वागत केले.

## सुरेश भोपी यांच्या वज्रमूठ काव्यसंग्रहास राष्ट्रीय पुरस्कार

**पनवेल : वार्ताहर**

विद्यार्थीप्रिय शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद, शब्दगंध समूह प्रकाशन, औरंगाबाद आणि आम्रपाली प्रकाशन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा बेस्ट रायटर नॅशनल अवॉर्ड यंदा जुई (कामोठे) येथील सुरेश कृष्णा भोपी यांच्या वज्रमूठ या काव्य-संग्रहाला मिळाला आहे. मौलाना आझाद रिसर्च सेंटर, औरंगाबाद येथे झाला. सिनेअभिनेत्री रूपाली पवार, यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन सुरेश भोपी यांना गौरविण्यात आले.

या वेळी अरुण घोडेराव, आनंद अहिरे, सदीप त्रिभुवन, लखन काशिकर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या यशाबद्दल माजी नगरसेवक विकास घरत व सहकाऱ्यांनी अभिनंदन केले.



## सूर निरागस हो समूहाचा सहावा वर्धापन दिन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सूर निरागस हो या समूहाला सहा वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सुरांच्या सुरेल अमृतधारा हा बहारदार सांगीतिक कार्यक्रम झाला. पनवेल येथील फडके नाट्यगृहात झालेल्या या कार्यक्रमाला भारतरत्न बिस्मिल्ला खाँ यांचे शिष्य पं. शैलेश भागवत, कोकणरत्न राजाभाऊ शेंबेकर तसेच रत्नागिरी येथील खल्वायन संस्थेचे श्रीनिवास जोशी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमात धनंजय जोशी, नांदेड व मुग्धा गावकर, गोवा आणि कस्तुरी देशपांडे, ठाणे या कलाकारांनी नाट्यपदे, अभंग, भक्तिगीते आदी गीतप्रकारांचे उत्तम सादरीकरण केले. त्यांना वरद सोहनी यांनी ऑर्गन, रामकृष्ण करंबेळकर यांनी तबला, सूरज गांधळी यांनी पखवाज तर समीर कर्वे यांनी तालवाद्यांची साथ केली. पूर्वा पेठे यांनी अभ्यासपूर्ण निवेदनाने कार्यक्रम रंगतदार केला.

सूर निरागस हो या संस्थेच्या किरण बापट, चंद्रकांत व जयश्री ताम्हनकर, चंद्रकांत मने, अविनाश व अनुश्री देव यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

**अनेक संगीतप्रेमींच्या अनमोल योगदानाने वर्धापन दिनाचा हा कार्यक्रम यशस्वी झाला. संस्थेच्या वतीने यापुढेही अशाच दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.**

**-किरण बापट, सूर निरागस हो संस्था**

## संकष्ट चतुर्थीनिमित्त चिरनेर महागणपतीच्या दर्शनाला गर्दी

**उरण : वार्ताहर**

चिरनेरच्या प्रसिद्ध हेमाड पंथीय मंदिरातील प्राचीन महाकाय श्री महागणपतीचे दर्शन घेण्यासाठी संकष्ट चतुर्थीनिमित्त भक्तांनी गुरुवारी (दि. १३) गर्दी केली होती.

चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या ऐतिहासिक वारसा बरोबरच चिरनेरच्या भूमीला प्राचीन देवस्थानचा परिसस्पर्श झाला आहे. श्री महागणपतीचे देवस्थान अत्यंत पुरातन असून, पेशवेकालीन भव्य मंदिरात श्री महागणपती विराजमान आहेत. पद्मासनात बसलेली श्री महागणपतीची मूर्ती सुमारे सहा फूट उंच व साडेतीन फूट रुंद आहे. शेंदूर चर्चित मूर्ती चतुर्भुज असून पूर्वाभिमुख आहे. हेमाडपंथीय धाटणीतील हे पाषाणी भव्य मंदिर पेशव्यांचे सरदार रामजी महादेव फडके यांनी उभारले असून, त्यांनीच या मंदिरात तळ्यात सापडलेल्या प्राचीन भव्य गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. या गणरायाच्या दर्शनासाठी भाविकांची नेहमीच गर्दी असते. न

नवी मुंबई, ठाणे, उरण, पनवेल, पेण परिसरातील शेकडो



गणेश भक्तांनी दर्शनासाठी पहाटेपासूनच गर्दी केली होती. चिरनेरचा महागणपती जरी अष्टविनायकात नसला तरी या भागातील भक्ता गणांचा ओढा हा अष्टविनायक गणपती प्रमाणेच दिवसेंदिवस वाढत चालला आहे. भाविकांना रांगेत सुरळीत दर्शन मिळावे यासाठी चिरनेर गणपती देवस्थानच्या वतीने चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती.

## सुधागड हायस्कूलमध्ये आरएसपी कार्यशाळा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

आरएसपी च्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाच्या नियोजनासंदर्भात कळंबोली येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक विद्यालयात नवी मुंबई, ठाणे व रायगडच्या आरएसपीच्या शिक्षकांची कार्यशाळा आयोजित करण्यात करण्यात आली होती. या कार्यशाळेत आरएसपीचे १२० शिक्षक व शिक्षिका सहभागी झाले होते.

या वेळी वाहतूक नियंत्रण विभागाचे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड, पनवेल प्रादेशिक परिवहन विभाग अधिकारी एम. व्हि. विधाते, पोलीस मुख्यालय कळंबोलीचे आरपीआय कृष्णा धमपुरकर, अग्निशमन दलाचे मुख्य अधिकारी अंकुश पाटील, कळंबोली वाहतूक शाखेचे निशिकांत विश्वाकार, मुंबई विभाग आर एस. पी. सहसचिव सुभाष मोरे तसेच कोकण विभागीय समादेशक हिराजी पाटील यांनी मार्गदर्शन केले. अग्निशमन दलाच्या जवानांनी अग्निशमन विषयी विशेष प्रात्यक्षिक करून दाखविले.

या वेळी निवृत्त उपसमादेशक यशवंत पाटील तसेच दिलीप देशमुख, बबन सावद, यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान कोकण विभागीय समादेशक हिराजी पाटील यांनी भुषविले. प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी केले. नियोजन आरएसपी समादेशक विलास पाटील, कार्यकारिणी सदस्य शितलकुमार शिंदे, हणमंत डुबल, सुनील धनावडे, गिरीश पाटील, सचिन खराटे, नजिर शेख, वैशाली पटाडे, शरद कुंभार, प्रियंवदा तांबोटकर, भिमराव सोनावणे, सचिन जाधव, राजेंद्र सोनवणे, ललिता सिंह, नलिनी पाटील, विलास गायकर, दिलिप गोंधळी, देवेंद्र म्हात्रे यांनी केले.



## कापणीच्या हंगामात परतीच्या पावसाचा धुमाकूळ

# सुधागडातील भातशेतीला तडाखा

### नुकसानभरपाई द्यावी | शेतकऱ्यांची मागणी

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात परतीच्या पाऊस व वादळी वाऱ्याने भातपिके आडवी झाली आहेत. विजांचा कडकडाट व विजांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस कोसळत असल्यामुळे ऐन कापणीच्या हंगामात हातातोंडाशी आलेला घास गळून पडण्याची भीती सुधागड तालुक्यातील शेतकऱ्यांत निर्माण झाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून परतीच्या पावसाने सुधागड तालुक्यात धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे भातशेतीसह नाचणी, वरी, पालेभाजी या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तालुक्याच्या काही भागातील शेती पाण्याखाली बुडाली आहे तर काही ठिकाणची पिके पूर्णतः झोपली आहेत. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. भिजलेल्या भाताला कवडीमोलाचा भाव मिळेल, अशी चिंता शेतकऱ्यांना भेडसावू लागली आहे.



परतीच्या पावसामुळे भातशेती व अन्य पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जलद नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी पालीसह अन्य विभागातील शेतकऱ्यांनी केली आहे.

नैसर्गिक व आस्मानी संकटाने शेतकरी शेतीपासून दूर चालला आहे, त्याचा अभ्यास करण्यासाठी समिती संघटीत करावी. व समितीच्या शिफारशीनुसार भातपिक शेतकऱ्यांना सोई-सुविधा व योग्य मोबदला देण्यात यावा, अशी मागणी सुधागड शेतकरी संघटनेचे सचिव शरद गोळे यांनी केली आहे.

नैसर्गिक आपत्तीने शेतकरी संकटात सापडले आहेत. कापणीला आलेली पिके उद्ध्वस्त झाली आहेत. शेतकऱ्यांना पुन्हा उभे राहण्यासाठी सरकारने आवश्यक ती मदत करावी, अशी मागणी आदिवासी समाजाचे नेते रमेश पवार यांनी केली आहे. परतीच्या पावसात भातशेती पाण्याखाली गेली आहे. चिखलात रुतलेले भात काढणे मुश्किल झाले आहे. सरकारने मदतीचा हात द्यावा, अशी अपेक्षा शेतकरी माधुरी भोईर आणि बाळा काटकर यांनी व्यक्त केली.

## पालकमंत्री उदय सामंत यांनी घेतली डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारींची सदिच्छा भेट



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी (दि. १३) सकाळी रेवदंडा येथे येऊन ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची सदिच्छा भेट घेतली. पालकमंत्री सामंत जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीसाठी अलिबाग येथे आले होते, त्यांनी ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या रेवदंडा येथील निवासस्थानी जावून सदिच्छा भेट घेतली. निरूपणकार सचिनदादा धर्माधिकारी व राहूलदादा धर्माधिकारी यांनी त्यांचे स्वागत केले. ना. सामंत यांनी डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्याशी अर्धा तास संवाद साधला. या वेळी आमदार महेंद्र दळवी, आमदार भरत गोगावले, शिवसेना (शिंदे गट) जिल्हा प्रमुख राजा केणी, जिपचे माजी सदस्य संजय जांभळे उपस्थित होते.

## वढाव येथे लहान मुलांचा भोंडला



**पेण :** तालुक्यातील वढाव येथील म्हसोबा देवस्थान येथे नुकताच लहान मुलांचा भोंडला झाला. दीव व वढाव येथील शालेय विद्यार्थ्यांनी या वेळी ऐलमा पैलमा गणेश देवा हे गीत सादर करीत भोंडल्यास सुरुवात केली. जगदंबा मातेच्या गीताने समारोप करण्यात आला. सुजाता पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राधीबाई म्हात्रे यांनी ढोलवादन केले. सर्व मुलांना खोबऱ्याची खिरापतीचे वाटप करण्यात आले.

## फणसडोंगरी येथील विद्यार्थी बेपत्ता

**पेण : प्रतिनिधी**

शहरातील फणस डोंगरी येथील राजेंद्र म्हात्रे यांचा मुलगा रियांशु म्हात्रे हा सोमवार (दि. १०) पासून घरातून बेपत्ता झाला आहे. हा रियांशु म्हात्रे सार्वजनिक विद्यामंदिर येथील शाळेत इयत्ता नववीमध्ये शिकत असून



परीक्षा सुरू असल्याने पेपर झाल्यावर घरात दप्तर ठेऊन तो आई-वडिलांना न सांगताच निघून गेला. त्यामुळे आई वडील चिंतेत असून त्याची सर्व ठिकाणी शोधाशोध सुरू आहे. सापडल्यास ८१४९५६१६२१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## स्वराज्य संघटनेच्या लवेज शाखेचे छत्रपती संभाजीराजेंच्या हस्ते उद्घाटन

**खोपोली : प्रतिनिधी**

कोकणातील जनतेने छत्रपती शिवाजी महाराजांच्यावर ज्याप्रमाणे प्रेम केले असेच प्रेम त्यांच्या वंशजांवरही करावे, असे आवाहन छत्रपती शिवाजी महाराज यांचे तेरावे वंशज छत्रपती संभाजीराजे यांनी खोपोली येथे केले.

खोपोली नगर परिषद हद्दीतील लवेज गावामधील स्वराज्य संघटनेच्या शाखेचे उद्घाटन छत्रपती संभाजीराजे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. मराठा संघटनेचे नेते विनोद साबळे, राज्य समन्वयक डॉ. सुनील पाटील, शाखा अध्यक्ष योगेश पाटील यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व त्यांचे सहकारी या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

छत्रपती संभाजी राजे यांचे लवेज गावात ढोल ताशाच्या गजरात स्वागत करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत खोपोली शहराच्या विविध भागातील स्वराज्य संघटनेच्या शाखांचे उद्घाटन करण्यात आले.



## एक्स्प्रेस वे प्रवासाची नंदीबैलाने घेतली धास्ती

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील धोकादायक प्रवासाचा अनुभव माणसांप्रमाणे प्राण्यांनाही येत आहे. भरधाव गॅस टँकरने कार आणि पिकअपला धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात मालकासह किरकोळ जखमी झालेल्या नंदीबैलाने धास्ती घेत काहीकाळ चाऱ्याला तोंड लावले नाही. दिवाळी सणापूर्वी घाटमाथ्यावरून मालकासह नंदीबैल पोटापाण्यासाठी कोकण भागात येत असतात. पिकअप जीपमधून प्रवास करणाऱ्या नंदीबैल आणि त्याच्या मालकाला मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर किरकोळ अपघात झाला. खोपोली हद्दीत गॅस टँकरने पुढे असलेल्या कारला



जोरदार ठोकर दिली. त्यामुळे कार पिकअपवर जाऊन जोरात आढळली. या अपघातात पिकअपमधील नंदीबैलाच्या तोंडाला आणि पायाला मार लागला. जखमी नंदीबैलाला खालापूर येथील पशुवैद्यकीय रुग्णालयात आणण्यात आले होते. पशुवैद्यकीय अधिकारी पी. एन. गायकवाड यांनी नंदीबैलावर उपचार केले. या अपघाताने धास्तावलेल्या नंदीबैलाने बराच वेळ चाऱ्याला तोंडही लावले नाही.

## दिघीत मुली, महिलांना आरोग्यविषयक मार्गदर्शन

**मुरुड : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय बालिका दिनाचे औचित्य साधून अदानी फाउंडेशनच्या वतीने मंगळवारी (दि. ११) दिघी आरोग्य उपकेंद्रात किशोरवयीन मुली व महिलांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी अदानी फाउंडेशनच्या जयश्री काळे यांनी उपस्थित मुली व महिलांना आरोग्य, शिक्षण व पोषण यावर माहिती दिली व आगामी काळात महिला व किशोरवयीन मुलींसाठी विविध उपक्रम राबविणार असल्याचे सांगितले. आरोग्यसेविका मंगल



पाबरेकर यांनी किशोरवयीन मुलींना मासिक पाळी व्यवस्थापन व जागृती याबद्दल माहिती दिली. ग्रामसखी अर्चना कासारे आणि वैभवी मेंदाडकर यांनी आरोग्य विषयक सवयी व स्वच्छता याबद्दल मार्गदर्शन केले. या वेळी अदानी फाउंडेशनकडून उपस्थित मुली व महिलांना सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले. फाउंडेशनचे अवधूत पाटील यांनी आभार मानले.

# धान व भरडधान्य खरेदीकरिता मुदतवाढ

## पोर्टलवर शेतकरी नोंदणी करण्याचे प्रशासनाकडून आवाहन

**अलिबाग : जिमाका**

धान व भरडधान्य खरेदी केंद्रावर सबएजंट संस्थांमार्फत शेतकरी नोंदणीची अंतिम मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत होती, मात्र आता शेतकरी नोंदणी करण्यासाठी २५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

केंद्र शासनाने खरीप पणन हंगाम २०२२-२३ अंतर्गत राज्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान व भरडधान्य खरेदीकरिता शेतकरी नोंदणी करण्याबाबत कळविले होते. त्यानुषंगाने मंजूर झालेल्या धान व भरडधान्य खरेदी केंद्रावर सबएजंट संस्थांमार्फत शेतकरी नोंदणीची अंतिम मुदत १५ ऑक्टोबर २०२२ पर्यंत होती. परंतु NeML पोर्टलवरील मागील हंगामातील ११ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या शेतकरी नोंदणीच्या अहवालानुसार शेतकरी नोंदणी अल्प प्रमाणात झाल्याचे दिसून आले. या कारणास्तव धान व भरडधान्य खरेदीकरिता NeML पोर्टलवर शेतकरी नोंदणी करण्यासाठी २५ ऑक्टोबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

शेतकरी नोंदणी करताना या हंगामापासून ज्या शेतकऱ्यांचा सातबारा आहे, त्याच शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष ड्खतए झक्जढज अपलोड करणे आवश्यक आहे, त्याशिवाय नोंदणी पूर्ण होत नाही. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांना शेतमालाची विक्री करावयाची आहे त्याच शेतकऱ्यांनी LIVE PHOTO अपलोड करण्यासाठी स्वतः खरेदी केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

ज्या शेतकऱ्यांना शेतमालाची विक्री करावयाची आहे, त्या शेतकऱ्यांनी नोंदणीकरिता LIVE PHOTO अपलोड करण्याकरिता स्वतः उपस्थित राहावे. शेतकरी नोंदणीची अंतिम मुदत २५ ऑक्टोबर असल्यामुळे दिलेल्या मुदतीतच शेतकरी नोंदणी पूर्ण करण्यात यावी.

कोणत्याही परिस्थितीत शेतकरी नोंदणीकरिता ऑफलाइन अर्ज स्वीकारण्यात येणार नाही याची संबंधित सबएजंट संस्थानी नोंद घ्यावी, असे दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेडचे सरव्यवस्थापक डॉ. अतुल नेरकर यांनी सूचित केले आहे.

# रखडलेल्या चारफाटा ते भिसेगाव रस्त्याचे काम त्वरित सुरू करावे

## अन्यथा तीव्र आंदोलन; अमोघ कुळकर्णी यांचा कर्जत नगर परिषदेला इशारा

**कर्जत : प्रतिनिधी**

चारफाटा ते भिसेगाव बिकानेरपर्यत रखडलेल्या रस्त्याच्या कामाबाबत भिसेगाव ग्रामस्थांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते अमोघ कुळकर्णी यांनी कर्जत नगर परिषद प्रशासनास निवेदन दिले आहे. या रस्त्याचे अर्धवट काम १५ दिवसात चालू करण्यात यावे, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनात दिला आहे.

कर्जत नगर परिषद हद्दीतील चारफाटा ते भिसेगाव बिकानेर हा महत्त्वाचा रस्ता आहे. कर्जत एसटी डेपोमधील बस, रिक्षा व खाजगी वाहने तसेच रेल्वे स्टेशनला जाणारे पादचारी, पंचक्रोशीतील ग्रामस्थ व रहिवासी या रस्त्यावरून ये-जा करीत असतात. या रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रेटीकरण करावे, या मागणीसाठी अमोघ कुळकर्णी व त्यांचे सहकारी १ जून २०२१ रोजी उपोषणास बसले होते. त्या वेळी नगर परिषदेचे तत्कालीन मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी उपोषणस्थळी मा. सिद्धिविनायक कन्स्ट्रक्शन प्रोप्रा नरेश अदसानी यांना सदर रस्त्याची वर्कऑर्डर दिली होती. त्यानुसार या रस्त्याचे भूमिपूजन ५ जून २०२१ रोजी करण्यात आले होते. या वर्कऑर्डरमध्ये एक वर्षाच्या आत रस्त्याचे काम पूर्ण करण्याची मुदत देण्यात आली आहे. मात्र दिड वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही या रस्त्याचे काम अजूनही अर्धवट स्थितीत आहे. ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे या रस्त्याचे काम अर्धवट पडले आहे, त्याचा त्रास नागरिकांना विशेषत:



पादचारी व वाहन चालकांना सहन करावा लागत आहे, असे सामाजिक कार्यकर्ते अमोघ कुळकर्णी आणि स्थानिक नगरसेवक सोमनाथ ठोंबरे यांनी कर्जत नगर परिषद प्रशासनास दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.या रस्त्याच्या बेजबाबदार ठेकेदारावर विलंबशुल्क आकारण्यात येण्यात यावा तसेच रस्त्याचे काम १५ दिवसाच्या आत चालू करण्याचे आदेश देण्यात यावे व काम सुरु करावे, अन्यथा या रस्त्यावर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा अमोघ कुळकर्णी यांनी या निवेदनात दिला आहे.

## कर्जतमधील विकासकामांची मुख्याधिकाऱ्यांकडून पाहणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर वैभव गारवे यांनी शहरात सुरू असलेल्या विकासकामांना अचानक भेट देऊन पाहणी केली. या वेळी अनेक कामांमध्ये त्रुटी आढळून आल्या. त्यामुळे त्यांनी कामाचा दर्जा सुधारण्याचे आदेश ठेकेदारांना दिले. पुढील भेटीच्या वेळी कामांचा दर्जा आढळून आला नाही तर कारवाई केली जाईल, असेही गारवे यांनी ठेकेदारांना सूनावले.

स्वच्छ सर्वेक्षण अभियानात नवी दिल्लीत सत्कार झाल्यामुळे कर्जत या 'क' वर्ग नगर परिषदेच्या कारभाराकडे देशाचे लक्ष असणार आहे. त्यामुळे शहरात होणारी कामे आणि सध्या सुरु असलेली विकासकामे यांचा दर्जा उच्चपातळीचा असावा, असा कर्जत नगर परिषद प्रशासनाचा



प्रयत्न आहे. त्यासाठी शहरातील विविध भागात फिरून मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी सुरु असलेल्या विकासकामांची पाहणी करण्याचे सत्र सुरू केले आहे.

कर्जत शहरातील काही रस्त्यांच्या कामाच्या दर्जाबद्दल मुख्याधिकारी गारवे यांनी नाराजी व्यक्त केली. त्यांच्या या सरप्राईज व्हीजिटमध्ये ठेकेदार प्रत्यक्ष कामावर हजर नसल्याचे आढळून आले. त्यामुळे संबंधीत ठेकेदारांना बोलावून कामाचा दर्जा कायम राखण्याच्या सूचना देतानाच मुख्याधिकारी गारवे यांनी, दर्जाबाबत संभ्रम असल्यास ठेकेदारावर कारवाई करावी, असे आदेश नगरअभियंता मनिष गायकवाड आणि स्वच्छता निरीक्षक सुदाम म्हसे यांना दिले आहेत.

मुख्याधिकारी यांच्या या भेटीमुळे कर्जत नगर परिषद हद्दीतील विकासकामे दर्जेदार होतील, असा विश्वास नागरिकांमधून व्यक्त होत आहे. तसेच अशाच भेटी मुख्याधिकारी यांनी शहरातील वेगवेगळ्या भागात आठवड्यातून किमान एकदा तरी द्यायला हव्यात, अशी अपेक्षादेखील काही नागररिकांनी व्यक्त केली.

## महिला आशिया चषक स्पर्धा

# भारत अंतिम फेरीत

## थायलंडवर मात; शफालीची चमकदार कामगिरी



**ढाका : वृत्तसंस्था**

बांगलादेश येथे सुरू असलेल्या महिला आशिया चषक स्पर्धेत गुरुवारी (दि. १३) भारतीय संघाने थायलंडवर ७४ धावांनी दणदणीत विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. आता भारताची लढत श्रीलंका संघाशी येत्या शनिवारी (दि. १५) होईल.

उपांत्य सामन्यात थायलंडने नाणेफेक जिंकत भारताला प्रथम फलंदाजी करण्याचे आव्हान दिले होते. भारताने शफाली वर्मा आणि कर्णधार हरमनप्रीत कौर यांच्या महत्त्वपूर्ण खेळीच्या जोरावर २० षटकांत सहा गडी गमावत १४८ धावसंख्या उभारली. थायलंड संघ २० षटकांत नऊ बाद ७४ धावाच करू शकला. थायलंडच्या केवळ दोघी फलंदाजानाच दुहेरी धावसंख्या करता आली, तर दोन फलंदाजाना भोपळाही फोडता आला नाही. मधल्या फळीतील बोचाथ्मने २९ चेंडूंत २१ धावा आणि सलामीवीर–यष्टीरक्षक नन्नापट कोंचाओएनकाय हिनेही २१ धावाच केल्या. फक्त चेंडू जास्त खेळले. बोचाथ्मला स्नेह राणाने बाद केले. मेघना सिंगने दोन षटके टाकताना सहा धावा देत एक गडी बाद केला. दीप्तीने चार षटकांत सात धावा देत तीन बळी घेतले. मागच्या सामनातील मालिकावीर राजेश्वरी गायकवाडने चार षटकांत १० धावा देत दोन गडी बाद केले. फलंदाजीबरोबर गोलंदाजीतही उत्कृष्ट कामगिरी करणारी शफाली वर्माला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला तिनेही एक गडी बाद केला.

तत्पूर्वी भारतीय संघाची सलामीवीर शफाली वर्माने आक्रमक खेळी करीत २८ चेंडूंत ४२ धावांची खेळी केली, पण जोडीदार स्मृती मंधाना १३ धावा करीत मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात बाद झाली. त्यानंतर या मालिकेत मधल्या फळीत दोन अर्धशतक करणारी जेमीमाह रोड्रिगेझ कर्णधार हरमनप्रीतच्या साथीने मोठे फटके मारत धावगती वाढवण्याचा प्रयत्न केला. दोघींमध्ये ४२ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी झाली. जेमीमाहने २६ चेंडूत २७ धावा, तर हरमनप्रीत कौरने ३० चेंडूंत ३६ धावा केल्या. रिचा घोष लवकर बाद झाल्याने सर्व जबाबदारी ही पूजा वस्त्रकारवर आली. तिने १३ चेंडूंत १७ धावा करीत भारताला १४० धावांचा टप्पा ओलांडण्यास मदत केली. थायलंडकडून टिपोचने भारताचे तीन गडी बाद करीत चार षटकांत अवघ्या २४ धावा दिल्या. माया, पुथावोंग आणि बुचाथाम या तिघींनी प्रत्येकी एक गडी बाद करीत भारताला १५० धावांच्या आत रोखले.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र दुसऱ्या स्थानी





**सुरत : वृत्तसंस्था**

सात वर्षांच्या कालखंडानंतर झालेल्या ३६व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पुन्हा एकदा सेनादलाने बाजी मारली. सेनादलाने एकूण १२८ पदकांसह सलग चौथ्या वर्षी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. महाराष्ट्र ३९ सुवर्ण, ३८ रौप्य आणि ६३ कांस्य अशा सर्वाधिक १४० पदकांसह दुसरे स्थान प्राप्त केले, तर हरयाणाने ३८ सुवर्ण, ३८ रौप्य आणि ४० कांस्य अशा ११६ पदकांसह तिसरे स्थान मिळविले.

महाराष्ट्राने आपल्या मोहिमेची सांगताही सोनेरी यशाने केली. बॉक्सिंगमध्ये निखिल दुबेने ७५ किलो वजनी गटात सुवर्णपदक मिळविले. महाष्ट्राला पहिल्याच दिवशी नेमबाजीत रुद्रांक्ष पाटीलने सुवर्णपदक मिळवून दिले होते. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत एकूण ३६ क्रीडा प्रकारांचा समावेश होता. महाराष्ट्राने २८ क्रीडा प्रकारांत किमान एक पदक मिळविले. यामध्ये सर्वाधिक २२ पदके (प्रत्येकी पाच सुवर्ण व रौप्य, १२ कांस्य) जलतरणात पटकावली. त्यानंतर योगासनात १४ आणि मल्लखांबमध्ये १२ पदके मिळविली. महाराष्ट्राला सर्वाधिक सहा सुवर्णपदके मल्लखांबमध्ये मिळाली.

गुजरातमधील सुरत शहरात ३६व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा समारोप सोहळा उपराष्ट्रपती जगदिश धनखड यांच्या हस्ते झाला. या सोहळ्यास लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, क्रीडामंत्री हर्ष संघवी, कॅबिनेटमंत्री मुकेश पटेल, भारतीय ऑलिम्पिक महासंघाचे सरचिटणीस राजीव मेहता आदी उपस्थित होते.

## दुसऱ्या सराव सामन्यात भारताचा पराभव; कर्णधार राहुलची झुंजार खेळी



**पर्थ : वृत्तसंस्था**

पर्थमध्ये वेस्टर्न ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळल्या गेलेल्या या सामन्यात टीम इंडियाचा ३६ धावांनी पराभव झाला.

टीम इंडियाने ऑस्ट्रेलियातील मिशन टी–२० विश्वचषकाला शानदार सुरुवात केली. पहिल्या अनौपचारिक सराव सामन्यात त्यांनी वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचा १३ धावांनी पराभव केला, पण त्याच संघाविरुद्ध खेळल्या गेलेल्या दुसऱ्या अनौपचारिक सराव सामन्यात टीम इंडियाला ३६ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. वेस्टर्न ऑस्ट्रेलियाने दिलेल्या १६९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघ सात गड्यांच्या मोबदल्यात १३२ धावाच करू शकला. भारताकडून कर्णधार राहुलने सर्वाधिक ७४ धावा केल्या. राहुलशिवाय बाकीच्या फलंदाजांनी निराशा केली.

अर्शदीप सिंगने आपल्या पहिल्याच षटकात वेस्टर्न ऑस्ट्रेलियाला पहिला धक्का दिला, मात्र यानंतर निक हॉब्सन आणि डार्सी शॉर्ट यांनी मजबूत भागीदारी रचली. दोन्ही खेळाडूंनी अर्धशतके ठोकली, पण हर्षलने हॉबसनला बाद केल्यावर त्याच षटकात शॉर्टही धावबाद होऊन पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर अश्विनने एकाच षटकात तीन बळी घेत भारताला सामन्यात पुनरागमन केले. यानंतर अर्शदीपने १८व्या षटकात ८ धावा आणि भुवीने १९व्या षटकात ७ धावा दिल्या.

## मुश्ताक अली क्रिकेट स्पर्धेत मुंबईचा सलग दुसरा विजय

**राजकोट : वृत्तसंस्था**

डावखुऱ्या यशस्वी जैस्वालच्या (४४ चेंडूंत नाबाद ६६ धावा) अप्रतिम फलंदाजीच्या जोरावर मुंबईने सय्यद मुश्ताक अली ट्वेन्टी–२० क्रिकेट स्पर्धेच्या सामन्यात मध्य प्रदेशला आठ गडी आणि १८ चेंडू राखून पराभूत केले. हा मुंबईचा या स्पर्धेतील सलग दुसरा विजय ठरला.

या सामन्यात मध्य प्रदेशने दिलेले १८२ धावांचे लक्ष्य मुंबईने १७ षटकांत गाठले. सलामीवीर पृथ्वी शॉ (१२ चेंडूंत २९) आणि कर्णधार अजिंक्य रहाणे (१७ चेंडूंत ३०) यांनी मुंबईच्या डावाची आक्रमक सुरुवात केली. त्यानंतर यशस्वीने सर्फराज खानच्या (१८ चेंडूंत ३०) साथीने ६२ धावांची भागीदारी रचत मुंबईला विजयासमीप नेले. सर्फराज बाद झाल्यावर यशस्वीला अमन खानची (११ चेंडूंत नाबाद २१) उत्तम साथ लाभल्याने मुंबईने सहज विजय मिळवला. तत्पूर्वी मध्य प्रदेशने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ७ बाद १८१ अशी धावसंख्या केली होती.

# पाठीच्या दुखापतीमुळे चहरही ट्वेन्टी–२० विश्वचषकाला मुकणार

## शमी, सिराज, शार्दूलमध्ये स्पर्धा







**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जायबंदी जसप्रीत बुमराची भारतीय संघात जागा घेण्यासाठी प्रमुख दावेदारांपैकी दीपक चहरलाही पाठीच्या दुखापतीमुळे आगामी ट्वेन्टी–२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला मुकावे लागणार आहे. त्याच्या अनुपस्थितीत बुमराच्या जागेसाठी मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज आणि शार्दूल ठाकूर यांच्यात स्पर्धा असून हे तिघेही लवकरच ऑस्ट्रेलियासाठी रवाना होणार आहेत.

ट्वेन्टी–२० विश्वचषकासाठी भारतीय संघ काही दिवसांपूर्वी ऑस्ट्रेलियात दाखल झाला, मात्र या स्पर्धेसाठी राखीव खेळाडू म्हणून निवड झालेले फलंदाज श्रेयस अय्यर आणि लेग–स्पिनर रवी बिश्नोई हे खेळाडू दक्षिण आफ्रिकेच्या एकदिवसीय मालिकेत खेळले तसेच या मालिकेसाठी चहरचीही भारतीय संघात निवड झाली होती, परंतु पाठीच्या दुखापतीमुळे तो या मालिकेत खेळू शकला नाही. त्याऐवजी तो बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत (एनसीए) दाखल झाला. तिथे त्याची दुखापत काहीशी गंभीर असल्याचे स्पष्ट झाले.

ट्वेन्टी–२० विश्वचषकाच्या भारतीय संघात बुमराची जागा कोण घेणार हे निश्चित करण्यासाठी १५ ऑक्टोबपर्यंतचा वेळ आहे. त्यामुळे शमी, सिराज आणि शार्दूल यांना त्वरित ऑस्ट्रेलियात नेऊन त्यांची तंदुरुस्ती आणि लय तपासण्याचा भारतीय संघ व्यवस्थापनाचा प्रयत्न आहे. भारताचा सलामीचा सामना २३ ऑक्टोबरला होणार असल्याने ऑस्ट्रेलियातील परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी या खेळाडूंना पुरेसा वेळ मिळेल.

शमीला ऑस्ट्रेलियात खेळण्याचा सर्वाधिक अनुभव असल्याने बुमराची जागा घेण्यासाठी त्याला पसंती मिळण्याची दाट शक्यता आहे, मात्र दक्षिण आफ्रिकेविरुद्ध नुकत्याच झालेल्या एकदिवसीय मालिकेत सिराजने चमकदार कामगिरी केली. त्याने या मालिकेच्या तीन सामन्यांत पाच बळी मिळवित मालिकावीराचा पुरस्कार पटकाविला, तर मुंबईकर शार्दूलमध्ये गोलंदाजीसह फलंदाजीचीही क्षमता असल्याचा भारतीय संघाला फायदा होऊ शकेल. आता या तिघांतून कुणाची निवड होते याकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# थाळीफेकपटू कमलप्रीतवर तीन वर्षांची बंदी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

थाळीफेकपटू कमलप्रीत कौर, भारतातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंपैकी एक आहे, पण तिच्यावर तीन वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. ॲथलेटिक्स इंटिग्रिटी युनिटने त्याच्यावर उत्तेजक सेवनप्रकरणी (डोपिंग)प्रकरणी कारवाई केली आहे. या वर्षी ७ मार्च रोजी एआययूने कमलप्रीतची पटियाला येथे तपासणी केली असता त्यात स्टेरॉईड पॉझिटिव्ह आढळले. यानंतर या वर्षी मे महिन्यात तिला तात्पुरते निलंबित करण्यात आले होते.

२६ वर्षीय कमलप्रीतच्या नमुन्यात स्टॅनोझोलॉल आढळून आले. हे एक सामान्य ॲनाबॉलिक स्टिरॉइड आहे आणि जागतिक ॲथलेटिक्सनुसार ते प्रतिबंधित पदार्थांच्या यादीमध्ये समाविष्ट आहे. एआययूने एका निवेदनात म्हटले आहे, कमालप्रीतला २९ मार्चला एआययूद्वारे तात्पुरते निलंबित केले होते. तिच्या चाचणीत आढळून आले की तिने फेब्रुवारी महिन्यात दोन प्रोटीन सप्लिमेंटचे दोन चमचे घेतले होते. यामध्ये स्टॅनोजोलोलचे अंश सापडला आहे. नमुना ए आणि नमुना बी यांची तपासणी करण्यात आली.

कमलप्रीतने टोकियो गेम्समध्ये चमकदार कामगिरी करीत सहावे स्थान पटकाविले. त्याने गेल्या वर्षी टोकियो खेळापूर्वी थाळीफेकध्ये ६५.०६ मीटरचा राष्ट्रीय विक्रम केला होता. पात्रता फेरीत दुसऱ्या स्थानावर राहिल्यानंतर टोकियो खेळामध्ये तिने अंतिम फेरी गाठली होती जिथे तिने ६३.७० मीटरच्या सर्वोत्तम प्रयत्नासह सातवे स्थान पटकाविले होते. ॲथलेटिक्सच्या मैदानी स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूची ही तिसरी सर्वोत्तम कामगिरी ठरली.

कमलप्रीतने एका खासगी प्रयोगशाळेत चार सप्लिमेंट्सची चाचणी केली होती आणि एका प्रोटीन सप्लिमेंटमध्ये स्टेरॉइडचे नमूने आढळले होते.

## ‘सूर्यकुमार वर्ल्डकपमध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल’

**मुंबई : प्रतिनिधी**

मैदानाच्या कोणत्याही कोपऱ्यात चेंडू मारण्याची क्षमता असलेला फलंदाज सूर्यकुमार यादव आगामी ट्वेन्टी–२० विश्वचषकात भारतासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावेल, असे मत दक्षिण आफ्रिकेचा माजी वेगवान गोलंदाज डेल स्टेनने व्यक्त केले. आफ्रिकेचा दिग्गज फलंदाज एबी डिव्हिलियर्सप्रमाणे सामन्यावर प्रभाव पाडण्याची सूर्यकुमारमध्ये क्षमता असल्याचेही स्टेनने नमूद केले.

‘सूर्यकुमार मैदानाच्या कोणत्याही कोपऱ्यात चेंडू मारू शकतो आणि त्याची फलंदाजी पाहून मला एबी डिव्हिलियर्सची आठवण होते. तो भारताचा डिव्हिलियर्स होऊ शकतो. सूर्यकुमारमध्ये सामने जिंकवून देण्याची क्षमता आहे. तो सध्या अप्रतिम लयीत असल्याने ट्वेन्टी–२० विश्वचषकात त्याच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष असेल,’ असे स्टेन म्हणाला.

दरम्यान, सूर्यकुमारने आयसीसीच्या ट्वेन्टी–२० क्रमवारीतील फलंदाजांच्या यादीत दुसरे स्थान राखले आहे.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com